दैनिक

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष – ६ वे अंक –१७८ | गुरूवार दि.०५ मार्च २०२६ | 98 22 62 85 21 | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रू | पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-178 | Thursday, Dt.05 March 2026 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4


## सरकारचा मुखवटा फाडणार

### आ. रोहित पवार यांचा पत्रकार परिषदेत थेट इशारा

मुंबई । प्रतिनिधी

राज्याच्या राजकारणात आज मोठी खळबळ उडाली, जेव्हा शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी पत्रकार परिषद घेत सत्ताधाऱ्यांवर जोरदार हल्लाबोल केला. जनतेची दिशाभूल करणाऱ्यांचा खरा चेहरा आम्ही उघड करणार आहोत, असा थेट इशारा त्यांनी दिला.पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी राज्यातील विविध प्रलंबित प्रश्नांवर सरकारला धारेवर धरले. शेतकरी कर्जमाफी, बेरोजगारी आणि औद्योगिक गुंतवणुकीबाबत सरकार अपयशी ठरल्याचा आरोप त्यांनी केला. मोठमोठ्या घोषणा केल्या जात आहेत, पण प्रत्यक्षात जमिनीवर काहीच दिसत नाही, असे ते म्हणाले.यावेळी त्यांनी काही कथित



कागदपत्रांचा उल्लेख करत लवकरच मोठा खुलासा करणार असल्याचे संकेत दिले. ही फक्त सुरुवात आहे. पुढील काही दिवसांत आम्ही पुराव्यांसह सत्य जनतेसमोर मांडू, असे सांगत त्यांनी राजकीय वातावरण आणखी तापवले.सरकारकडून मात्र या आरोपांना अद्याप अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही. मात्र, पवार यांच्या आक्रमक भूमिकेमुळे राज्यातील राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

दरम्यान, त्यांच्या या पत्रकार परिषदेनंतर सोशल मीडियावरही विविध प्रतिक्रिया उमटताना दिसत आहेत. पुढील काही दिवसांत या प्रकरणावरून राजकारण आणखी रंगण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## बीड जिल्ह्यात इंधन तुटवडा नाही कोणीही अफवांवर विश्वास ठेवू नका – जिल्हाधिकारी

बीड ।प्रतिनिधी

आखाती देशातील काही भागात निर्माण झालेल्या युद्धाच्या तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यात इंधन तुटवडा निर्माण झाल्याची अफवा काही ठिकाणी पसरत असल्याचे निदर्शनास आले आहे. मात्र प्रत्यक्षात असे काही नसून इंधन मुबलक प्रमाणावर असल्याने जनतेने अफवांवर विश्वास ठेवू नये असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने नागरिकांना आवाहन करत स्पष्ट केले आहे की, जिल्ह्यात पेट्रोल व डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असून इंधन पुरवठा सुरळीत सुरू आहे. अफवांमुळे काही पेट्रोल पंपांवर वाहनधारकांनी अतिरिक्त इंधन साठवण्यासाठी गर्दी केल्याचे दिसून आले. मात्र, जिल्ह्यात कोणत्याही प्रकारचा इंधन तुटवडा नसून सर्व पेट्रोल पंपांवर नियमितपणे इंधन पुरवठा केला जात आहे. त्यामुळे नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता अनावश्यक गर्दी टाळावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

सर्व पेट्रोल पंप कंपनीचे विक्री अधिकारी व प्रतिनिधींना इंधन पुरवठा सुरळीत ठेवण्याबाबत आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत. चुकीची माहिती पसरविणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाने



दिला आहे.

नागरिकांनी संयम बाळगून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी बीड यांनी सुद्धा प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

## बीड जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान यशस्वीपणे राबवणार - जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सर्व महसूल मंडळांमध्ये महसूल सेवा अधिक लोकाभिमुख करण्यासाठी आणि नागरिकांचे प्रलंबित प्रश्न तातडीने निकाली काढण्यासाठी बीड जिल्हा प्रशासनामार्फत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समापन शिबिर अभियान – टप्पा २ राबविण्यात येणार आहे. यासंदर्भात दि. २६.०२.२०२६ रोजी सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसीलदार आणि महसूल मंडळाधिकारी व इतर विभागांच्या जिल्हास्तरीय आढावा बैठक घेण्यात आली.हे अभियान १०० टक्के यशस्वी करण्याचे निर्देश प्रशासकीय अधिकारी कर्मचारी आणि जनतेला बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन (भा.प्र.से.) यांनी पत्रकार परिषदेतून दिले आहेत.हे अभियान ८ मार्च २०२६ ते १५ मे २०२६ या कालावधीत राबविले जाणार आहे. सामान्य जनता, शेतकरी, महिला आणि विद्यार्थी यांचे महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन प्रश्न एकाच ठिकाणी निकाली काढणे, हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. एकाच दिवशी सेवा वितरण या संकल्पनेवर हे अभियान आधारित असेल.या शिबिरांमध्ये नागरिकांना खालीलप्रमाणे महत्त्वाच्या सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. दाखले वाटप: विद्यार्थ्यांसाठी शाळा/कॉलेज प्रवेशासाठी आवश्यक दाखले दिले जातील. लोकसेवा हक्क कायद्यानुसार प्रलंबित अर्ज





निकाली काढून तसेच पूर्वी प्राप्त अर्जांच्या अनुषंगाने प्राप्त वितरण करणे.७/१२ अद्ययावत करणे: प्रलंबित व विवादास्पद फेरफार निकाली काढणे, जिवंत ६/१२, मोहीमांतर्गत अद्ययावत ७/१२ चे वाटप आणि फेरफार नोंदी दुरुस्त केल्या जातील.जमिनी संबंधित प्रकरणे: भोगवटादार वर्ग–१ जमीन वर्ग–२ मध्ये परावर्तित करणे, अकृषिक सुधारणा कायद्यानुसार गरजीनुसार करणे, तुकडेबंदी कायद्यान्वये फेरफार आणि अकृषिक (छ–) परवानी नोंदी अद्ययावत केल्या जातील.सामाजिक अर्थसहाय्य: विविध शासकीय योजनांच्या पात्र लाभार्थ्यांना मंजुरी आदेशांचे वाटप करण्यात येईल.डिजिटल ७/१२: महाभूमी पोर्टलवरील टठ उेवश डिजिटल ७/१२ ला पूर्ण कार्यान्वित ठेवत असल्याबाबत जनजागृती करणे.कमी–जास्त पत्रके: भूसंपादन व अकृषिक परवानी दिलेल्या प्रकरणांत 'कमी–जास्त पत्रके' तयार करून गाव नमुने अद्ययावत करणे बाबत शासन निर्णयातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.इतर सेवा: एरीशेष उेळपस ईीळपर्शीी सुधारणा व नागरी सुविधा, समाधान शिबिरामध्ये एक खिडकी सुविधा अंतर्गत आधार नोंदणी दुरुस्ती, ई–नामजारी, अंशांक, पी.एम. किसान व तक्रार निवारण कक्ष (जनता दरबार).१८ फेब्रुवारी ते ५ मार्च या कालावधीत अभियानाची पूर्वतयारी करण्यात येत आहे. यामध्ये संभाव्य लाभार्थ्यांची यादी तयार करणे, लोकप्रतिनिधींशी संवाद साधणे आणि गावोगावी दवंडी व सोशल मीडियाद्वारे जनजागृती करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या आहेत.करिता छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समापन शिबिर अभियानांतर्गत वरीलप्रमाणे देण्यात येणाऱ्या सर्व सेवांचा लाभ बीड जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी, शेतकरी आणि विद्यार्थ्यांनी आपल्या जवळच्या महसूल मंडळ स्तरावरील शिबिराची माहिती घेऊन या अभियानाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन विवेक जॉन्सन, जिल्हाधिकारी बीड, यांनी केले आहे.

## मला राजकारणच नाही तर आयुष्यातून उठवण्याचे हे षडयंत्र – धनंजय मुंडे

### खोटे पुरावे उभे करून बदनामी करून कुणाचेही आयुष्य उध्वस्त करू नका – धनंजय मुंडे

मुंबई ।प्रतिनिधी

राज्याच्या कृषीमंत्री पदी असताना केलेल्या कृषी साहित्य खरेदी संदर्भात मा. उच्च न्यायालया पाठोपाठ राज्य लोकायुक्त यांनी देखील आपल्याविरुद्ध केलेले सर्व आरोप फेटाळून लावले असून आपण शासनाच्या नियमानुसार व शेतकऱ्यांचे हित समोर ठेऊनच संबंधित खरेदी बाबतचा निर्णय शासनाच्या विशेष कृती आराखड्याच्या अंतर्गत घेतला होता. या प्रकरणात न्यायव्यवस्था आणि नियतीने सत्य समोर आणले आहे, असे म्हणत धनंजय मुंडे यांनी लोकायुक्तांच्या निर्णयावर समाधान व्यक्त केले आहे. आज मुंबईतील विधानभवन येथे धनंजय मुंडे यांनी बऱ्याच दिवसानंतर पत्रकारांशी सविस्तर चर्चा केली. कृषी साहित्य खरेदी, ऑफिस ऑफ प्रॉफिट असे नाना प्रकारचे आरोप माझ्यावर करण्यात आले, यामध्ये कृषी खरेदीबाबत सुरुवातीला मात. उच्च न्यायालयात ज्यांनी तक्रार केली होती, त्यांना खोटे पुरावे दिले आणि व्यावसायिक दृष्टिकोनातून शासनाची बदनामी केली म्हणून उच्च न्यायालयाने एक लाखांचा दंड ठोठावला, त्यांनी तो भरला सुद्धा.ऑफिस ऑफ प्रॉफिट, पिक विमा असा कोणताही आरोप सिद्ध झाला नाही, मात्र माझ्या बदनामीच्या ट्रायल रंगवून दाखवल्या केल्या. हे एक मोठे



षडयंत्र असून, मला केवळ राजकारण किंवा समाजकारण यामधून संपवायचे नाही तर काही लोकांना मी या पृथ्वीतलावर नको आहे, त्यातून हे सगळे घडवून आणले जात असल्याचा गंभीर आरोप धनंजय मुंडे यांनी यावेळी बोलताना केला. अंजली दमानिया यांच्या बाबत विचारले असता धनंजय मुंडे म्हणाले की त्यांनी संपूर्ण जीवनात नितीन गडकरी साहेब, स्व. अजितदादा, खडसे साहेब, भुजबळ साहेब, तटकरे साहेब अशा अनेक नेत्यांवर ढीगभर आरोप करून बदनामी केली, मात्र त्यांनी केलेला एकतरी आरोप कुठे सिद्ध झालेला आहे का ? केवळ खोटे पुरावे समोर आणायचे, माध्यमांच्या समोर सनसनी निर्माण करायची आणि एखाद्याला बदनाम करायचे, हे सगळे थांबवले गेले पाहिजे. असे कळकळीचे आवाहन धनंजय मुंडे यांनी केले. तर पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना आपण सध्यातरी अब्रुनुकसानीचा दावा दाखल करणार नसल्याचे मुंडेंनी स्पष्ट केले. दरम्यान मागील काही महिन्यांपासून आपल्या विरुद्ध मोठे षडयंत्र रचले जात आहे. त्यातूनच रोज नवनवीन आरोप आणि बदनामीची एक अजब मालिका सुरू आहे. मात्र न्यायव्यवस्थेसमोर एकही आरोप सिद्ध झालेला नाही. आपली बाजू सत्याची आणि त्यामुळेच नियती आपल्या सोबत आहे; त्यामुळे सहकारी आणि कार्यकर्त्यांनी देखील संयम ठेवावा

## होळीच्या रंगोत्सवात बंजारा बांधवांशी जुळला स्नेहबंध

अंबड । प्रतिनिधी

होळीच्या मंगलमय वातावरणात बदनापूर–अंबड मतदारसंघात आमदार नारायण कुचे यांनी तांडे,वाड्या–वस्त्यांवर जाऊन बंजारा समाजासोबत रंगोत्सव साजरा करत सामाजिक सलोखा आणि आपुलकीचा सुंदर संदेश दिला.

अंबड तालुक्यातील पारनेर तांडा ईश्वर नगर,लालवाडी तांडा,सोनक पिंपळगाव, गोविंदपूर तांडा,संत सेवालाल नगर,मसाई तांडा,राहुवाडी, मसाई तांडा–२,पिंपरखेड, दुधपुरी तांडा,गंगाराम वाडी, बोरी तांडा,भासू नाईक तांडा, वलखेडा तांडा,भीमा नाईक तांडा,वलखेडा तांडा–२,मठ जळगाव तांडा,रामनगर तांडा, जोगेश्वर वाडी,झिरपी तांडा, बक्ष्याची वाडी,कैलास नगर आदी ठिकाणी त्यांनी भेटी देत होळीच्या शुभेच्छा दिल्या.

या दौऱ्यादरम्यान आयोजित करण्यात आलेल्या जावळा बारशा समारंभालाही आ.नारायण कुचे यांनी उपस्थिती लावली.लहानग्या ईश्वरच्या जावळा प्रसंगी त्यांनी कुटुंबीयांचे अभिनंदन करत बालकांना उत्तम आरोग्य दीर्घायुष्य आणि उज्ज्वल भवितव्य लाभो अशी प्रार्थना व्यक्त केली.होळीच्या रंगोत्सवात साजरा झालेला हा आनंदसोहळा उपस्थितांच्या मनात कायमचा कोरला गेला.

आमदार नारायण कुचे हे सातत्याने मतदारसंघातील तांडे–वाड्यांवर जाऊन जनतेशी प्रत्यक्ष संवाद साधत असतात. पायाभूत सुविधा पाणीपुरवठा, रस्ते,वीज आणि समाजविकासाच्या विविध कामांमुळे त्यांनी बंजारा समाजासह सर्व घटकांमध्ये विश्वासाचे नाते निर्माण केले आहे. होळीच्या निमित्ताने त्यांनी सामाजिक ऐक्य बंधुता आणि परस्पर स्नेह यांचा संदेश दिला.

यावेळी स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच बंजारा समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.रंग, आनंद आणि परंपरेचा संगम असलेल्या या उत्सवात आमदार कुचे यांच्या उपस्थितीमुळे उत्साह दुणावल्याचे चित्र सर्वत्र पाहायला मिळाले.

## जालना जिल्ह्यात कुऱ्हाडबंदीचा फज्जा पर्यावरणाचा उघड्यावर लिलाव

### पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या जिल्ह्यातच वृक्षतोडीचा धुमाकूळ जिल्हाधिकारी डॉ. अमिषा मित्तल यांच्याकडे जनतेची नजर

जालना ।प्रतिनिधी

एकीकडे सरकार कोट्यवधींचा निधी खर्च करून वृक्षारोपणाचे डोंगर उभे करत असल्याचे दावे करत आहे तर दुसरीकडे जालना जिल्ह्यातच पर्यावरणाचा अक्षरशः कत्तलखाना सुरू असल्याचे धक्कादायक चित्र समोर येत आहे.जिल्ह्यात कुऱ्हाडबंदी लागू असतानाही अंबड,घनसावंगी, परतूर,मंठा,जाफराबाद, भोकरदन,बदनापूर आणि जालना तालुक्यांत लिंब,आंबा, चिंच यांसारख्या फळझाडांची आणि पुरातन वृक्षांची बेसुमार तोड सुरू असल्याने संतापाची लाट उसळली आहे.

वनविभागाचे अर्थपूर्ण मौन की संगनमत ?

स्थानिक सूत्रांच्या माहितीनुसार काही वनकर्मचाऱ्यांच्या आशीर्वादाने सॉ–मिल चालक आणि बाहेरील लाकूड माफिया निर्धास्तपणे झाडांवर कुऱ्हाड चालवत आहेत.दिवसाढवळ्या मोठमोठी झाडे पाडून त्यांची थेट सॉ–मिलपर्यंत वाहतूक केली जात आहे.कोणताही वैध परवाना नसताना होणारी ही तोड पाहून कायद्याचा धाक संपलाय का ? असा प्रश्न नागरिक विचारू लागले आहेत. हप्तेखोरीच्या जोरावर ही वृक्षतोड राजरोस सुरू असल्याचा गंभीर आरोप पर्यावरणप्रेमींकडून होत आहे.

सॉ–मिल की बेकायदा कत्तलखाने ?

तालुक्यांतील अनेक सॉ–मिलवर रात्री–अपरात्री लाकडांची साठवणूक केली जात असल्याची माहिती आहे.बंदी असलेल्या वृक्षांची निर्लज्जपणे तोड होत असताना संबंधित यंत्रणा मात्र कागदोपत्री




कारवाईच्या नावाखाली मौन बाळगत असल्याची टीका होत आहे.परिणामी निसर्गसंपत्तीची उघडपणे लूट सुरू असून जालना जिल्हा हळूहळू उघडच्या वाळवंटाच्या दिशेने वाटचाल करत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

पर्यावरण मंत्र्यांची परीक्षा

जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री असलेल्या पंकजा मुंडे या राज्याच्या पर्यावरण मंत्री देखील आहेत.आपल्या जिल्ह्यातच पर्यावरणाचा असा ऱ्हास होत असताना त्या लाकूड माफियांवर नेमकी काय कारवाई करणार ? दोषींना अभय देणाऱ्या अधिकाऱ्यांवर गंडांतर ओढवणार का ? असा थेट सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

तसेच धडाकेबाज निर्णयांसाठी ओळखल्या जाणाऱ्या जिल्हाधिकारी डॉ.अमिषा मित्तल या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करणार का याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.आता तरी जागे व्हा

अंबड तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात जर तातडीने कठोर पावले उचलली नाहीत तर भविष्यात पाण्याचा तुटवडा तापमानवाढ आणि शेतीचे अपरिमित नुकसान यांचा सामना करावा लागेल अशी भीती तज्ज्ञ व्यक्त करत आहेत.

सरकारच्या हरित घोषणांपलीकडे प्रत्यक्षात हिरवाई वाचवण्यासाठी धाडसी निर्णय घेण्याची वेळ आली आहे. अन्यथा कुऱ्हाडबंदी हा केवळ कागदी दिखावा ठरेल आणि जालना जिल्ह्याचे हरित वैभव इतिहासजमा होईल यात शंका नाही.

## जिल्ह्यातील चुकीचे फार्मर आयडी दुरुस्तीसाठी पर्याय उपलब्ध करा!

### शंकर देशमुख यांची मुख्यमंत्री व पंकजाताईंकडे मागणी..!



बीड । प्रतिनिधी

शासनाकडून शेतकऱ्यांना विविध योजनेचा पारदर्शक लाभ देण्यासाठी फार्मर आयडी ही संकल्पन राज्यभर राबवून, बंधनकारक करण्यात आली आहे. परंतु बीड जिल्ह्यात शासनाकडून पथदर्शी प्रकल्पा अंतर्गत काढलेले फार्मर आयडीमध्ये जमिनीचे वाढीव क्षेत्र जोडल्यामुळे शेतकरी पोखरासह विविध योजनेने लाभापासून पासून वंचित राहत आहेत. जिल्हामध्ये फार्मर आयडी योजना राबवताना शेतकऱ्यांची जमीन धारणा तलाठी यांनी केली होती. जमीन धारणा करताना प्रत्येक गटामध्ये १ हेक्टर ९९ आर एवढे अवास्तव जमीन दाखवण्यात आलेली आहे. ८ अ पेक्षा जास्त जमीन जोडल्यामुळे लाभ घेताना अडचणी निर्माण होत आहे. शासन स्तरावरून तलाठी मार्फत ( फार्मर आयडीला ) दुरुस्ती देण्यात आली. परंतु क्षेत्र कमी करण्यासाठी अद्याप पर्यंत कुठलाही पर्याय उपलब्ध नाही.

या अनुषंगाने भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी परळी येथील पशुधन महा एक्स्पो मेळाव्यात मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व मंत्री पंकजाताई मुंडे यांच्याकडे प्रत्यक्ष भेटून व पत्राद्वारे फॉर्मर आयडी दुरुस्तीची मागणी केली आहे.दुरुस्तीमुळे फॉर्मर आयडीमधील वाढीव क्षेत्र कमी होऊन, शेतकऱ्यांना पीक विमा, पोखरा, महाडीबीटी सारख्या योजना राबवताना अडचणीचा सामना करावा लागणार नाही.


शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!

प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन

दहिवाळ सुवर्णकार

नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777

शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

6 x 6.5

संपादकीय....

# गेमचेंजर करार

भारत आणि युरोपीय महासंघामध्ये खुला व्यापार करार झाल्यानंतर अमेरिकेला चांगल्याच मिरच्या झोंबल्या. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प एकामागून एका देशाला अतिरिक्त कर लादत आहेत. भारतावरही त्यांनी पन्नास टक्के आयात शुल्क लादले. म्हणूनच भारताने जगातील अनेक देशांबरोबर करार करण्यासाठी वेगवान पावले उचलली. म्हणूनच हा 'गेमचेंजर' करार अमेरिका, चीनसारख्या देशांना खुपणे स्वाभाविक आहे.

२७ राष्ट्रांच्या गटाला होणारी देशाची निर्यात वाढून देशांतर्गत उत्पादन वाढेल. २०२४-२५ या आर्थिक वर्षात भारताचा युरोपीय महासंघाचा द्विपक्षीय वस्तूंचा व्यापार १३६.५३ अब्ज डॉलर्सचा होता. त्यात ७५.८५ अब्ज डॉलर्सची निर्यात आणि ६०.६८ अब्ज डॉलर्सची आयात होती. यामुळे युरोपीय महासंघ भारताचा सर्वात मोठा वस्तू-व्यापार भागीदार बनला आहे. भारताच्या एकूण निर्यातीपैकी युरोपीय महासंघ बाजारपेठेचा वाटा अंदाजे १७ टक्के आहे, तर भारतात युरोपीय महासंघाची निर्यात भारताच्या एकूण परदेशी आयातीपैकी नऊ टक्के आहे. हा करार पुढील वर्षाच्या सुरुवातीला लागू होण्याची अपेक्षा आहे. युरोपीय महासंघ हा जगातील सर्वात मोठा आयातदार आहे. 'कराराची जननी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या करारामुळे भारताला महत्त्वपूर्ण फायदे मिळण्याची अपेक्षा आहे. भारतातील जवळजवळ सर्व निर्यात वस्तू २७ युरोपीय देशांमध्ये शून्य किंवा अत्यंत कमी कर दराने प्रवेश करतील. देशातील कृषी उत्पादक, सेवा पुरवठादार आणि औषधनिर्माण आणि कापड उत्पादन क्षेत्रातील कंपन्यांना याचा फायदा होईल. यामुळे मोठ्या प्रमाणात नोकऱ्या निर्माण होण्याची अपेक्षा आहे. तथापि, हा करार अमेरिका आणि चीनच्या आर्थिक गतिमानतेसाठी एक नवीन आव्हान निर्माण करू शकतो.

अमेरिकेने भारतावर अतिरिक्त शुल्क आणि चीनने संवेदनशील वस्तूंवर निर्यात निर्बंध लादून निर्माण केलेला दबाव या करारामुळे निरर्थक ठरण्याची शक्यता आहे. ताज्या करारामुळे स्थिर लोकसंख्या असलेल्या युरोपीय देशांना मोठी बाजारपेठ मिळेल. या करारामुळे युरोपीय संघालाही लक्षणीय फायदा होण्याची अपेक्षा आहे. युरोपीय देश सध्या उच्च महागाई आणि आर्थिक मंदीचा सामना करत आहेत. लोकसंख्या वाढीमध्ये लक्षणीय घट झाल्यामुळे तेथे वस्तूंचा वापर थांबत आहे. या परिस्थितीत युरोपीय कंपन्यांना १.४ अब्ज लोकसंख्या असलेला भारतासारखा देश मित्र म्हणून समोर आला आहे. तो त्यांच्या वस्तूंसाठी एक प्रमुख केंद्र बनू शकतो. यामुळे संपूर्ण युरोपची आर्थिक परिस्थिती मजबूत होईल. इटली आणि फ्रान्ससारखे देश महागड्या वाइन उत्पादनासाठी जगप्रसिद्ध आहेत. आतापर्यंत भारतात या वाइनच्या विक्रीवर शंभर टक्के किंवा त्याहून अधिक कर आकारला जात होता. तथापि, करारानंतर हे दर सुमारे दहा टक्क्यांपर्यंत कमी केले जाऊ शकतात. यामुळे भारतातील परदेशी वाइनची विक्री आणि युरोपचा नफा वाढू शकतो. परिणामी, भारतीय वाइनप्रेमींना परवडणाऱ्या किमतीत उच्च दर्जाच्या परदेशी वाइन उपलब्ध होतील.

भारतात महागड्या परदेशी वाहनांच्या खरेदीदारांचा मोठा ग्राहकवर्ग आहे. मात्र युरोपीय बनावटीच्या कार खरेदी करण्यासाठी जादा कर लागतात. ते बहुतेकदा वाहनांच्या किमतीइतकेच असतात. त्यामुळे नोंदणी प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर वाहनाची खरेदी किंमत दुप्पट होते. तथापि, आता भारत-युरोपीय व्यापार करारानंतर हे कर लक्षणीयरीत्या कमी होण्याची अपेक्षा आहे. यामुळे युरोपीय देशांना भारतात उच्च दर्जाच्या कार विकण्याची संधी मिळेल आणि भारतातील नवश्रीमंतांना परवडणाऱ्या किमतीत उच्च दर्जाच्या कार मिळू शकतील. भारतात स्वस्त कामगार उपलब्ध होतील, रोजगार वाढेल. अमेरिकेने देशात काम करणाऱ्या परदेशी नागरिकांसाठी व्हिसा नियम कडक केले आहेत. आज अमेरिका परदेशी नागरिकांना नोकरी देण्यापासून रोखत असल्याचे दिसून येते. तथापि, युरोपीयन अर्थव्यवस्था सेवा क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. ती त्यांच्या एकूण जीडीपीमध्ये ७० टक्के योगदान देते. परिणामी, युरोपीयन सेवा कंपन्यांना भारतात परवडणारे, कुशल कामगार उपलब्ध होतील.

# होळीच्या रंगोत्सवात बंजारा बांधवांशी जुळला स्नेहबंध

## आ.श्री नारायण कुचे यांची तांडे-वाड्यांवर भेट जावळा समारंभातही सहभाग

अंबड ।प्रतिनिधी

होळीच्या मंगलमय वातावरणात बदनापूर-अंबड मतदारसंघात आमदार नारायण कुचे यांनी तांडे,वाड्या-वस्त्यांवर जाऊन बंजारा समाजासोबत रंगोत्सव साजरा करत सामाजिक सलोखा आणि आपुलकीचा सुंदर संदेश दिला.

अंबड तालुक्यातील पारनेर तांडा ईश्वर नगर,लालवाडी तांडा,सोनक पिंपळगाव, गोविंदपूर तांडा,संत सेवालाल नगर,मसाई तांडा,राहुवाडी, मसाई तांडा-२,पिंपरखेड, दुधपुरी तांडा,गंगाराम वाडी, बोरी तांडा,भासू नाईक तांडा, वलखेडा तांडा,भीमा नाईक तांडा,वलखेडा तांडा-२,मठ जळगाव तांडा,रामनगर तांडा, जोगेश्वर वाडी,झिरपी तांडा, बक्ष्याची वाडी,कैलास नगर आदी ठिकाणी त्यांनी भेटी देत होळीच्या शुभेच्छा दिल्या.

या दौऱ्यादरम्यान आयोजित करण्यात आलेल्या जावळा बारशा समारंभालाही आ.नारायण कुचे यांनी उपस्थिती लावली.लहानग्या ईश्वरच्या जावळा प्रसंगी त्यांनी कुटुंबीयांचे अभिनंदन करत बालकांना उत्तम आरोग्य दीर्घायुष्य आणि उज्ज्वल भवितव्य लाभो अशी प्रार्थना व्यक्त केली.होळीच्या रंगोत्सवात साजरा झालेला हा आनंदसोहळा उपस्थितांच्या मनात कायमचा कोरला गेला.आमदार नारायण कुचे हे सातत्याने मतदारसंघातील तांडे-वाड्यांवर जाऊन जनतेशी





प्रत्यक्ष संवाद साधत असतात. पायाभूत सुविधा पाणीपुरवठा, रस्ते,वीज आणि समाजविकासाच्या विविध कामांमुळे त्यांनी बंजारा समाजासह सर्व घटकांमध्ये विश्वासाचे नाते निर्माण केले आहे. होळीच्या निमित्ताने त्यांनी सामाजिक ऐक्य बंधुता आणि परस्पर स्नेह यांचा संदेश दिला.यावेळी स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच बंजारा समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.रंग, आनंद आणि परंपरेचा संगम असलेल्या या उत्सवात आमदार कुचे यांच्या उपस्थितीमुळे उत्साह दुणावल्याचे चित्र सर्वत्र पाहायला मिळाले.



बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष अँड.सुभाष पिसुरे यांना वाढदिवसा निमित्त सत्कार करून शुभेच्छा देताना ज्येष्ठ विधिज्ञ अँड. बाळासाहेब बाहेगव्हाणकर, वकील संघ सचिव अँड. सुभाष काळे, अँड. विलास जोशी, अँड. चरखा, अँड. शेख रईस पठाण, अँड. श्याम महाजन सह इतर.

# कडधान्य प्रक्रिया युनिट स्थापन करण्यासाठी अर्ज सादर करावेत

बीड ।प्रतिनिधी

देशाला कडधान्यामध्ये स्वयंपूर्ण बनविण्याकरिता व आयातीवरील अवलंबित्वता कमी करण्याच्या उद्देशाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दि.११ ऑक्टोबर, २०२५ रोजी कडधान्य आत्मनिर्भरता अभियान कार्यक्रमाची सन २०२५-२६ ते सन २०३०-३१ पर्यंत राबविण्याची घोषणा केली आहे. राज्यात सदर अभियान रब्बी हंगाम सन २०२५-२६ पासून राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत तूर, उडीद व मसूर या प्रमुख कडधान्य पिकांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे.

कडधान्य पिकांच्या मूल्यवर्धनास चालना देऊन शेतकऱ्याचे उत्पन्न वाढविण्याच्या उद्देशाने कडधान्य आत्मनिर्भरता अभियान अंतर्गत काढणीपश्चात पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी काढणीपश्चात प्रक्रिया युनिट (झीलर्शीीळपस णपळीं) स्थापन करण्यास सन २०२६-२७ या वर्षात आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. या घटकासाठी वैयक्तिक अर्जदार, शेतकरी उत्पादक संस्था (ऋझजी), क्लस्टर स्तर महासंघ (उङऋ), प्राथमिक कृषी पतसंस्था (झ-उड) व महाराष्ट्रात विविध कायद्यांअंतर्गत नोंदणीकृत उपक्रम/ संस्था लाभ घेण्यास पात्र राहतील .सदर घटकासाठी प्रकल्प खर्चाच्या ३३% किंवा रु. २५.०० लाख प्रति युनिट यापैकी जे कमी असेल ते याप्रमाणे अनुदान देय असणार आहे.या अनुषंगाने शेतकरी बांधवाना अवाहन करण्यात येते कि, काढणीपश्चात प्रक्रिया युनिट (झीलर्शीीळपस णपळीं) घटकाचा लाभ घेण्याकरिता ऑफलाईन पद्धतीने विहित नमुन्यात अर्ज सादर करावेत.

घटक अंमलबजावणीबाबत कृषी विभागामार्फत वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या सूचना लागू राहतील. अधिक माहितीसाठी तालुका कृषी अधिकारी/जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

# राज्यस्तरीय 'फ्युजन २०२६' फॅशन शोमध्ये काव्या महिला महाविद्यालयाचा दिमाखदार विजय

काव्या महाविद्यालय आंबेजोगाईच्या विद्यार्थिनींनी पटकावले प्रथम पारितोषिक

आंबेजोगाई । प्रतिनिधी

दयानंद कला महाविद्यालय, आंबेजोगाई येथे आयोजित करण्यात आलेल्या 'फ्युजन २०२६' या राज्यस्तरीय फॅशन डिझाइन स्पर्धेत काव्या महिला महाविद्यालय, आंबेजोगाईच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय कामगिरी करत प्रथम पारितोषिक पटकावले. संपूर्ण महाराष्ट्रातील २२ महाविद्यालयांच्या सहभागात झालेल्या या स्पर्धेत काव्या महाविद्यालयाच्या संघाने आपल्या कल्पकता, सादरीकरण आणि आत्मविश्वासाच्या जोरावर सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

२५ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडलेल्या या रंगतदार फॅशन शोमध्ये काव्या महिला महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी शीतल जोशी हिने 'बॉलिवूड थीम'वर आधारित सादरीकरण करत परीक्षकांची मने जिंकली. पारंपरिक आणि आधुनिकतेचा सुंदर मिलाफ साधत केलेल्या या सादरीकरणाला प्रेक्षकांकडूनही उत्स्फूर्त दाद मिळाली.

या यशामागे संस्थेचे अध्यक्ष जयंत करपे सर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच प्राचार्य करुणा लोमटे मॅडम, प्रा. शीला होके, प्रा. अदमाने मॅडम व सर्व शिक्षक व कर्मचारीवर्ग यांनी विद्यार्थिनींचे विशेष कौतुक केले. त्यांच्या प्रोत्साहनामुळेच विद्यार्थिनींना हे यश संपादन करता आले, अशी भावना व्यक्त करण्यात आली.काव्या महिला महाविद्यालयाच्या या दिमाखदार यशामुळे आंबेजोगाई शहराच्या शैक्षणिक क्षेत्रात मानाचा तुरा रोवला गेला असून सर्व स्तरांतून विजेत्या विद्यार्थिनींचे अभिनंदन होत आहे.




# अंबड पोलिसांचा थरारक मिडनाईट ॲक्शन

## ३ किमी पाठलाग करून सराफा दुकान फोडणारा मुख्य सूत्रधार गजाआड पावणे दोन किलो चांदीसह चोरीची दुचाकी जप्त

अंबड ।प्रतिनिधी

गुन्हेगारांच्या वाढत्या धाडसाला अंबड पोलिसांनी अक्षरशः चपराक दिली आहे सराफा दुकाने फोडून सोन्या-चांदीवर डल्ला मारणाऱ्या आणि दुचाकी-चारचाकी चोरणाऱ्या सराईत टोळीचा कणा पोलिसांनी मोडला आहे.तब्बल तीन किलोमीटर अंधारात पाठलाग करून मुख्य सूत्रधार संतोष ओंकार गायकवाड रा. तलवाडा जि.बीड याला जेरबंद करण्यात आले.या धाडसी कारवाईत १ किलो ७४५ ग्रॅम चांदी आणि चोरीची मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे.सविस्तर असे की

अंबडमधील सराफा लाईनवरील राघव ज्वेलर्स हे दुकान फोडून चोरट्यांनी सोन्या-चांदीचे दागिने लंपास केले होते.या गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांनी प्रथम बाळू शिरसाट याला ताब्यात घेतले. चौकशीतून या प्रकरणाचा मास्टरमाईंड संतोष गायकवाड असल्याचे स्पष्ट झाले.

रात्रीचा थरार पोलिसांची विजेगती झेप कुंभीफळ येथील शेतवस्तीवर आरोपी लपून बसल्याची गोपनीय माहिती मिळताच पोलीस निरीक्षक संतोष




घोडके यांच्या नेतृत्वाखाली डी.बी.पथकाने मध्यरात्री दीड वाजता सापळा रचला.पोलिसांची चाहूल लागताच आरोपीने अंधाराचा फायदा घेत पळ काढला.पण कायद्याचे हात अधिक वेगवान ठरले पोलीस अंमलदार अरुण मुंडे आणि तुकाराम मदन यांनी काट्याकुट्यांतून शेतातून जीवाची पर्वा न करता तब्बल अडीच ते तीन किलोमीटर पाठलाग केला.अखेर चोहोबाजूंनी वेढा घालून या सराईत गुन्हेगाराला जमिनीवर लोळवत मुसक्या आवळल्या.१ किलो ७४५ ग्रॅम चांदी राघव ज्वेलर्स चोरीतील चक २१ उउ ३६९५ क्रमांकाची मोटारसायकल वडीगोद्री येथून चोरी आणखी गुन्ह्यांची उकल पोलिसी खाक्या दाखवताच आरोपीने इतर गुन्ह्यांची कबुली दिली राजणी ता.घनसावंगी येथील सुदर्शन मांडवे यांचे सराफा दुकान आणि कौसर शेख यांचे कापड दुकान फोडले. शेवगाव जि.अहिल्यानगर जिल्हा येथील टाटा सफारी चारचाकी चोरी. वडीगोद्री ता.अंबड येथील सुनील कुऱ्हाडे यांची मोटारसायकल चोरी. या कबुलीजबाबांमुळे आणखी अनेक गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.ही सदरची कारवाई जालना पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल,अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी,उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.सिद्धेश्वर धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली

पोलीस निरीक्षक संतोष घोडके, सपोनि अमोल गुरले,फौजदार भगवान नरोडे,तसेच पोलीस अंमलदार यशवंत मुंडे,दिपक पाटील,अरुण मुंडे,तुकाराम मदन,धनाजी गवळे,विजय केंद्रे, अशोक भांगळ,विनोद भानुसे, देवा डेंगळे यांनी ही धडाकेबाज कारवाई यशस्वी केली.

गुन्हेगारांनी कितीही वेगाने पळण्याचा प्रयत्न केला तरी कायद्याचे हात त्यांच्यापर्यंत पोहोचणारच अंबड पोलिसांनी मिडनाईट ॲक्शन प्लॅन मधून हे पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.अंबडमध्ये आता गुन्हेगारांसाठी एकच इशारा पळाल तर पकडले जाल

# राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचा ६ मार्च रोजी जालना दौरा विविध कार्यक्रमांना उपस्थिती

जालना ।प्रतिनिधी

राजस्थान राज्याचे राज्यपाल हरिभाऊ बागडे हे शुक्रवार दि.६ मार्च २०२६ रोजी जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांच्या भेटीमुळे जिल्ह्यात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. विविध शैक्षणिक व सामाजिक कार्यक्रमांना ते उपस्थित राहणार आहेत.

नियोजित कार्यक्रमानुसार, राज्यपाल बागडे हे दि.६ मार्च रोजी दुपारी २.५५ वाजता छत्रपती संभाजीनगर येथून जालना येथे आगमन करणार असून जेडीएस महाविद्यालयात त्यांचे स्वागत करण्यात येणार आहे. त्यानंतर दुपारी ३ ते ४ या वेळेत जालना ज्येष्ठ नागरिक मंचतर्फे आयोजित विशेष कार्यक्रमास ते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.



जिल्ह्यातील सामाजिक शैक्षणिक व बौद्धिक क्षेत्रातील मान्यवरांशी संवाद साधत राज्यपाल विविध विषयांवर मार्गदर्शन करणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. दौऱ्यादरम्यान सुरक्षा व नियोजनाबाबत प्रशासन सज्ज असून संबंधित यंत्रणांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत.कार्यक्रमानंतर सायंकाळी ४.३५ वाजता राज्यपाल हरिभाऊ बागडे हे जालना येथून छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करणार आहेत.राज्यपालांच्या या दौऱ्याकडे जिल्हावासीयांचे लक्ष लागले असून विविध क्षेत्रातील प्रतिनिधींची उपस्थिती अपेक्षित आहे.



# विज्ञानाची गोडी जिज्ञासेची उभारी

कै.दत्तासाहेब देशमुख माध्यमिक विद्यालय येथे राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा

घनसावंगी ।प्रतिनिधी

दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त कै. दत्तासाहेब देशमुख माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागात आणि वैज्ञानिक जिज्ञासेच्या वातावरणात कार्यक्रम पार पडला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक केशव अटकर होते.आपल्या प्रेरणादायी भाषणात त्यांनी विज्ञानाची संकल्पना अतिशय सोप्या आणि साध्या भाषेत विद्यार्थ्यांना समजावून सांगितली.जशी दृष्टी तशी सृष्टी या विचारातून विज्ञान म्हणजे केवळ प्रयोगशाळेतील विषय नसून आपल्या अवतीभवती दररोज घडणारी प्रक्रिया आहे हे त्यांनी प्रभावीपणे पटवून दिले.विज्ञान शाखा असो वा कला शाखा कोणत्याही क्षेत्रात गेलो तरी विज्ञानाचे अस्तित्व आपल्यासोबत असते हा महत्त्वपूर्ण संदेश त्यांनी विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवला.शिक्षकांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांची प्रयोगशीलतायानंतर शिक्षक संभाजी शिंदे आणि विठ्ठल सोमवारे यांनीही विद्यार्थ्यांना विज्ञानाची गोडी लागावी अशा प्रेरक शब्दांत मार्गदर्शन केले.विद्यार्थ्यांनीही आपले मनोगत व्यक्त करत विविध विज्ञान प्रयोग सादर केले.त्यांच्या कल्पकतेने आणि आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाने उपस्थितांची दाद मिळवली. प्रयोगांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी विज्ञान केवळ पुस्तकापुरते मर्यादित नसून प्रत्यक्ष जीवनाशी निगडित आहे, हे दाखवून दिले.कार्यक्रमाची सुरेख सांगताकार्यक्रमासाठी शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शामल कांगणे यांनी प्रभावीपणे केले तर आभार प्रदर्शन विष्णू गनकवार यांनी मानले.

# विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती भीमराज नगर राजुरी वेस नूतन कार्यकरणी जाहीर

## जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी विकास जोगदंड , सचिव पदी देवाभाऊ वडमारे यांची सर्वानुमते निवड




बीड ।प्रतिनिधी

भीमराज नगर राजुरी वेस भागातील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीची नूतन कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली. समितीच्या अध्यक्षपदी विकास जोगदंड तर सचिवपदी देवाभाऊ वडमारे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

रविवार, दिनांक १ मार्च रोजी बौद्ध विहार येथे रिपाई युवा प्रदेश अध्यक्ष पप्पूजी कागदे यांच्या उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली ही बैठक संपन्न झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी अमोल (आबा ) धनवे होते तर प्रमुख उपस्थितीमध्ये... रमेश गंगाधरे, अरुण कागदे, गोरख साळवे, मधुकर वडमारे, बापू वडमारे, दीपक ओवाळ, बाळू कांडेकर, प्रभाकर जोगदंड, बंडू भाऊ वडमारे, प्रदीप वाघमारे, गौरीशंकर वडमारे, संजय कागदे , जितेंद्र वडमारे,गोरख गायकवाड, विनोद सोनवणे,भूषण जोगदंड,विशाल साळवे, सचिन वडमारे, राजेश जोगदंड, मनोज वडमारे,समितीची निवड पुढील प्रमाणे अध्यक्षः-. विकास जोगदंड उपाध्यक्षः - बाळू सोनवणे सचिवः- देवाभाऊ वडमारे सहसचिवः - राम वडमारे संघटक : पप्पू साळवे सल्लागार : अजय वडमारे, प्रताप धनवे, सतीश वडमारे, शैलेश वडमारे प्रशांत कागदे, कार्याध्यक्ष व सदस्यः- आकाश धनवे, रुपेश गायकवाड, पवन जाधव, प्रवीण वडमारे,महेश कागदे, राहुल साबळे, अक्षय वडमारे, चिंटू वडमारे, अजिंक्य वडमारे, साहिल ओवाळ, निलेश शिंदे, पंकज जोगदंड, अजिंक्य सोनवणे, आशिष यादव, कनिष्कर जोगदंड, रोहित सोनवणे, पप्पू जोगदंड, मयूर कांबळे, स्वप्निल धनवे, अक्षय कागदे, रितिक वडमारे, रोहित धवन, गिरीश वडमारे, रितेश वडमारे,या बैठकीला भीमराज नगर राजुरीवेस परिसरातील नागरिक, महिला आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मातृभूमी राज्यस्तरीय समाज रत्न पुरस्कार २०२६ ने डि.जी.वानखेडे यांचा सन्मान

बीड ।प्रतिनिधी

मातृभूमी प्रतिष्ठान, बीड यांच्या वतीने प्रदान करण्यात येणारा मातृभूमी राज्यस्तरीय समाज रत्न पुरस्कार – २०२६ हा प्रतिष्ठेचा पुरस्कार ज्येष्ठ समाजसेवक व शिक्षणप्रेमी दौलत गोपाळा वानखेडे (डी. जी. वानखेडे) यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. शिक्षण, सामाजिक, सांस्कृतिक व आरोग्य क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत हा पुरस्कार जाहीर करण्यात आला. वानखेडे यांनी तब्बल ३३ वर्षे जिल्हा रुग्णालय धाराशिव (उस्मानाबाद), बीड व परभणी येथे प्रयोगशाळा व रक्तपेढीत प्रामाणिक सेवा बजावत रक्तदान शिबिरे, कर्करोग निदान शिबिरे तसेच विविध आरोग्य उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवला. त्यांच्या उत्कृष्ट सेवेसाठी त्यांना दोन वेळा वेतनवाढ (इन्क्रिमेंट) देऊन गौरविण्यात आले होते.

निवृत्तीनंतरही त्यांनी सामाजिक बांधिलकी जपत 'वाचाल तर वाचाल' फिरते मोफत वाचनालय या अभिनव उपक्रमाची स्थापना केली. आजपर्यंत त्यांनी ४४ फिरती मोफत वाचनालये सुरू करून स्वतःच्या खर्चातून सुमारे ३ हजार पुस्तके उपलब्ध करून दिली, ज्यामुळे लहान मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण होत आहे. तसेच महामानव अभिवादन ग्रुपच्या माध्यमातून गरजू विद्यार्थ्यांसाठी ५ मोफत शिकवणी वर्ग, शालेय साहित्य वाटप यांसारखे उपक्रम सातत्याने राबवले जात आहेत.



यापूर्वीही त्यांना क्रांतीबा ज्योतीबा फुले राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार (२०१७), पद्मपाणी राज्यस्तरीय सामाजिक पुरस्कार (२०१८-१९), तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचा मुकनायक पुरस्कार (२०२६) अशा विविध सन्मानांनी गौरविण्यात आले आहे.

या सन्मानामुळे बीड जिल्ह्याच्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील कार्याला नवी प्रेरणा मिळाली असून, वानखेडे यांच्या कार्याचा आदर्श तरुण पिढीसमोर उभा राहिला आहे. विविध मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# १० वी व इ. १२ वी विद्यार्थ्यांचे ग्रेस गुण अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरणे सुरु

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्हयातील सर्व प्राचार्य, मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक, खेळाडू यांना कळविण्यात येते की, प्रतिवर्षीप्रमाणे इयत्ता १० वी व १२ वी च्या खेळाडू विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज मागविले जातात. सन २०२५-२६ मध्ये ग्रेस गुणांसाठी केली जाणारी प्रक्रीया शासनाच्या आपले सरकार पोर्टलद्वारे ऑनलाईन करण्यात आली आहे. तसेच सदर पोर्टलद्वारे सर्व अर्ज ऑनलाईन प्रणालीद्वारेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्याकडे सादर करण्याची सुविधा निर्माण करुन देण्यात आली आहे.

खेळाडू विद्यार्थी / जिल्हयातील सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांनी आपले सरकार पोर्टलवर णठङ : हीींिः// ररश्रिशीरीझरी.ारहरेश्रश्रळपश.सीं.ळप या लिंकद्वारे सवलत गुणांचा अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावयाचा आहे. त्यासंदर्भात कोणताही खेळाडू जिल्हा क्रीडा कार्यालयास ऑफलाईन पध्दतीने अर्ज करणार नाही व अशा प्रकारचा अर्ज जिल्हा क्रीडा कार्यालयाकडुन स्विकारला जाणार नाही, जर अशी बाब कार्यालयाच्या निदर्शनास आली तर त्यासंदर्भात होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीस संबंधित संस्था जबाबदार राहतील.

अर्जासाठी आवश्यक कागदपत्रे

( १ ) परीक्षा प्रवेशपत्र ( कश्रश्र ींळलज्ञशीं ), ( २ ) प्रपत्र क्रमांक - एक, ( ३ ). प्रपत्र क्रमांक - दोन्न, ( ४ ) क्रीडा प्रमाणपत्र - अधिकृत क्रीडा स्पर्धेत सहभाग घेतलेले प्रमाणपत्र, ( ५ ) १२ वी करिता अर्ज करत असल्यास १० वी गुणपत्रक आवश्यक.

यापूर्वी अर्ज भरताना फोटो आणि स्वाक्षरी अपलोड करण्यासाठी करावी लागणारी बाब आता करावी लागणार नाही. ऑनलाईन अर्जा मध्ये विद्यार्थ्यांनी त्यांचा परीक्षा बैठक क्रमाक

( डशरीं छीीलशी ) नमूद करताच त्यांचा फोटो आणि सिस्टीममध्ये आपोआप ( -ीीं ऋशींलह ) उपलब्ध होईल त्यामुळे तांत्रिक चुका होण्याची शक्यता कमी झाली आहे.

इ. १० वी व इ. १२ वी विद्यार्थाचे ग्रेस गुण अर्ज शासनाच्या आपले सरकार पोर्टलवर ऑनलाईन अर्ज सादर करण्या करिता दि. ३१ मार्च २०२६ पर्यंत मुदत आहे. दि. ३१ मार्च २०२६ रोजी नंतर प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत याची जिल्ह्यातील सर्व प्राचार्य, मुख्याध्यापक, खेळाडू विद्यार्थी यांनी नोंद घ्यावी. अधिकच्या माहिती करीता क्रीडा मार्गदर्शक अविनाश पाटील यांना ९६२३७८११२१ या भ्रमणध्वनि वर संपर्क साधावा असे जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर हे कळवितात.

# राज्यस्तरीय हॉलीबॉल स्पर्धा अंबरनाथ, कबड्डी स्पर्धा नागपूर, कुस्ती स्पर्धा बीड तर खो-खो स्पर्धेचे बारामती येथे आयोजन

## महाराष्ट्राची क्रीडा परंपरा अधिक बळकट करण्यासाठी राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा - -उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

मुंबई ।प्रतिनिधी

यंदाच्या छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय हॉलीबॉल स्पर्धा अंबरनाथ येथे, छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा नागपूर येथे, स्वर्गीय खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा बीड येथे तसेच कै. भाई नेरुरकर चषक राज्यस्तरीय खो-खो स्पर्धा बारामती येथे आयोजित करण्याचा निर्णय आज घेण्यात आला. उपमुख्यमंत्री तथा क्रीडा व युवक कल्याण मंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

सन २०२५-२६ या वर्षात विविध राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांच्या आयोजनाबाबत सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे उपमुख्यमंत्री तथा क्रीडा व युवक कल्याण मंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी क्रीडा विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, क्रीडा व युवक कल्याण विभागाच्या आयुक्त शीतल तेली-उगले यांच्यासह कबड्डी, कुस्ती, हॉलीबॉल व खो-खो या खेळांच्या संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, राज्यातील क्रीडा संस्कृतीला चालना देण्यासाठी आणि युवा खेळाडूंना व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी विविध राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. राज्यातील क्रीडा क्षेत्र सक्षम करण्यासाठी अशा स्पर्धांचे आयोजन अत्यंत महत्त्वाचे आहे. ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंना समान संधी मिळावी, त्यांना दर्जेदार सुविधा उपलब्ध व्हाव्यात आणि राष्ट्रीयस्तरावर चमक दाखविण्यासाठी आवश्यक व्यासपीठ मिळावे, यासाठी शासन कटिबद्ध असल्याची ग्वाही त्यांनी दिली.


राज्यस्तरीय स्पर्धांमुळे नवोदित खेळाडूंना आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळणार असून क्रीडा क्षेत्रात स्पर्धात्मक वातावरण निर्माण होईल. यामुळे महाराष्ट्राची समृद्ध क्रीडा परंपरा अधिक बळकट होऊन राज्याला भविष्यात अधिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू मिळतील, असा विश्वास उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी व्यक्त केला.

# विडा येथे धुलीवंदनाच्या दिवशी जावयाची गर्दभ सवारी उत्साहात

## सत्तरी उलटलेले शिवाजीराव गालफाडे यांना मिळाला अनपेक्षित मान

केज ।प्रतिनिधी

केज तालुक्यातील विडा गावात प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी जावयाची गर्दभ सवारी ही आगळी वेगळी आणि हास्यविनोदाने नटलेली पारंपरिक प्रथा मंगळवार,दि.३ मार्च २०२६ रोजी मोठ्या जल्लोषात पार पडली. यंदाच्या सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे सत्तरी उलटलेले शिवाजीराव गालफाडे यांना अनपेक्षितपणे मानकरी म्हणून गौरविण्यात आले.



ग्रामीण संस्कृतीत जावयाला मानाचे स्थान देत त्याच्यावर प्रेमळ चेष्टा करण्याची ही परंपरा विडा गावात अनेक वर्षांपासून जपली जात आहे.साधारणपणे गावात आलेल्या जावयाची निवड करून त्याची सजवलेल्या गर्दभावरून मिरवणूक काढली जाते.मात्र यंदा घडलेल्या घडामोडींमुळे कार्यक्रमात वेगळाच रंग भरला.मिळालेल्या माहिती नुसार, सुरुवातीला धरून आणलेला जावई अचानकपणे निसटल्या मुळे गावकऱ्यांमध्ये थोडी धावपळ उडाली.त्यानंतर दुसरा जावई पकडून आणण्यात आल्याने कार्यक्रम पार पडेल,असे सर्वांना वाटत होते. मात्र याच दरम्यान गेली साठ वर्षे विडा गावात वास्तव्यास असलेले शिवाजीराव गालफाडे यांना गावकऱ्यांनी अचानकपणे मानकरी म्हणून निवडले.स्वतः शिवाजी गालफाडे यांनाही आपणच गर्दभ सवारीचे मानकरी ठरू, याची अजिबात कल्पना नव्हती.आपल्याला पकडतील आणि आपलीच गर्दभ सवारी काढतील असे त्यांना वाटले नव्हते,कारण दुसरा जावई आणल्या मुळे आपल्यावर वेळ येणार नाही,अशी त्यांची समजूत होती.परंतु गावकऱ्यांनी हसतखेळत त्यांना सजवून गर्दभावर बसवले आणि ढोल-ताशांच्या गजरात मिरवणूक काढली.

महिलांच्या उखाणे, पारंपरिक ओव्या,टाळ -मृदुंगाच्या नादात आणि तरुणांच्या जल्लोषात संपूर्ण गाव दुमदुमून गेले. लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांनी या सोहळ्यात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.शिवाजीराव गालफाडे यांनीही हा मान आनंदाने स्वीकारत परंपरेचा सन्मान राखला.

गावकऱ्यांच्या मते,अशा लोकपरंपरांमुळेच बीड जिल्ह्याची सांस्कृतिक ओळख अधिक उठून दिसते.नातेसंबंधातील स्नेह,आपुलकी आणि सामाजिक ऐक्य जपणारी ही प्रथा आजही तेवढ्याच उत्साहात साजरी होत असल्याचे चित्र विडा येथे पाहायला मिळाले.विडा ग्रामस्थांनी ही परंपरा पुढील पिढ्यांपर्यंत जतन करण्याचा निर्धार व्यक्त केला.अनपेक्षित वळणा मुळे रंगलेली यंदाची जावयाची गर्दभ सवारी ग्रामस्थांच्या स्मरणात दीर्घकाळ राहील,अशी प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.दरम्यान शिवाजीराव गालफाडे यांच्या चिरंजीव यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले की,एकीकडे थोडे दुःख वाटते परंतु गावाची प्रथा परंपरा चालू राहीली पाहिजे म्हणून सहमती दर्शवली आहे.

# देविदास आबा धस यांचे व्याही व राधेश्याम भैय्या धस यांचे सासरे राजेंद्र वाळके यांचे अपघाती निधन

## बुधवार दि. ४ मार्च रोजी दशक्रिया विधी संपन्न

आष्टी (प्रतिनिधी)

तालुक्यातील ढोबळसांगवी (ता. आष्टी) येथील रहिवासी राजेंद्र (राजाभाऊ) शंकर वाळके यांचे सोमवारी (दि.२) उपचारादरम्यान दुःखद निधन झाले. काही दिवसांपूर्वी नाशिक येथे विवाह सोहळ्यासाठी गेले असता त्यांचा अपघात झाला होता. या अपघातात ते गंभीर जखमी झाले होते. प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याने त्यांच्यावर तातडीने उपचार सुरू करण्यात आले होते; मात्र वैद्यकीय प्रयत्न अपुरे ठरले आणि सोमवारी त्यांची प्राणज्योत मालवली. मिळालेल्या माहितीनुसार, कै. राजेंद्र वाळके हे नाशिक येथे नातेवाईकांच्या विवाह समारंभासाठी गेले होते. कार्यक्रम आटोपून परत येत असताना झालेल्या अपघातात त्यांना गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर त्यांना तातडीने अहिल्यानगर येथील रुग्णालयात हलविण्यात आले होते. काही दिवस डॉक्टरांकडून शर्थीचे प्रयत्न करण्यात आले; परंतु उपचार सुरू असतानाच सोमवारी त्यांचे निधन झाले. या घटनेमुळे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.



कै. राजेंद्र वाळके हे आ. सुरेश आण्णा धस यांचे मोठे बंधू देविदास धस (आबा) यांचे व्याही होते तर राधेश्याम (भैय्या) धस यांचे सासरे होते. सामाजिक व कौटुंबिक पातळीवर त्यांचा मोठा परिचय आणि आपुलकीचा स्वभाव होता. गावातील विविध सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग असायचा. त्यांच्या निधनाने ढोबळसांगवी गावासह आष्टी तालुक्यात शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात भाऊ भागचंद शंकर वाळके, देविदास शंकर वाळके, नानासाहेब शंकर वाळके, पुत्र अजित राजेंद्र वाळके, कु. वैष्णव राजेंद्र वाळके, पुतण्या कु. अनिकेत नानासाहेब वाळके, कन्या सौ. रीमा राधेश्याम धस आणि पुतणी सौ. शिवानी गणेश सावंत असा मोठा आप्तपरिवार आहे.

कुटुंबप्रमुख म्हणून त्यांनी जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळल्या होत्या. त्यांच्या आकस्मिक जाण्याने कुटुंबियांसह नातेवाईक आणि मित्रपरिवारात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांचा अंत्यविधी ढोबळसांगवी येथे सोमवार दि. २ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता संपन्न झाला.

कै. राजेंद्र शंकर वाळके यांचा दशक्रिया विधीचा कार्यक्रम बुधवार दिनांक ४ मार्च २०२६ रोजी सकाळी ८ वाजता ढोबळसांगवी येथे संपन्न झाला. या विधीस राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक तसेच नातेवाईक, मित्रपरिवार व ग्रामस्थांनी उपस्थित राहून श्रद्धांजली अर्पण केली. दशक्रिया विधी प्रसंगी भागवताचार्य ह.भ.प. अशोक महाराज भोसले (श्री नामदेव महाराज वारकरी संस्था, पारगाव - जोगेश्वरी, ता. आष्टी, जि. बीड) यांचे प्रवचन संपन्न झाले. कै. राजेंद्र वाळके यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन करत त्यांच्या आत्म्यास शांती लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

# भव्यदिव्य विज्ञान प्रदर्शन उत्साहात संपन्न

केज/प्रतिनिधी

जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित, स्वामी विवेकानंद विद्या मंदिरमाध्यमिक विभाग या शाळेमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त भव्यदिव्य असे विज्ञान प्रदर्शन भरवण्यात आले. यामध्ये ५ वी ते ६ वी (लहान गट ) व ७ वी ते ८ वी (मोठा गट) या दोन गटामध्ये मिळून एकूण ४३ विध्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.या कार्यक्रमाचे उद्घाटन जीवन विकास शिक्षण मंडळ केज या संस्थेचे सचिव जी.बी.गदळे, शाळेचे मा.मुख्याध्यापक व विज्ञान शिक्षक बी.पी. तिडके,ज्ञानसागरकोचिंग क्लाससेसचे संचालक प्रा.सिद्धेश्वर वायबसे शाळेच्या मु.अ.शिवनंदा मुळे यांनी केले.उद्घाटना नंतर या कार्यक्रमाचे परीक्षण शाळेतील विज्ञान शिक्षिका श्रीमती. गुंड मॅडम,विटेकर मॅडम तसेच तट सर व मैंद सर यांनी केले.सर्व विध्यार्थ्यांनी अत्यंत उत्कृष्ट व विलोभनीय असे प्रयोग सादर केले. यामध्ये विध्यार्थ्यांनी लेझर तंत्रज्ञानाद्वारे पाण्यातील जिवाणू ओळखणे,भूअंतर्गत भूकंपाच्या हालचाली, स्वामी विवेकानंद स्मार्ट स्कूल,व इतर असे उल्लेखनीय प्रयोग सादर केले.राष्ट्रीय विज्ञान दिना निमित्त विज्ञान प्रदर्शनामध्ये लहान गटातून स्वरा राऊत हिने प्रथम पारितोषिक पटकावले.सोहम



कापरे याने द्वितीय तर अनुज चाळक व विराज शिंदे यांनी तृतीय पारितोषिक मिळविले.तर मोठ्या गटातून अजय आदमाने व अथर्व नेहरकर यांनी प्रथम क्रमांक पटकावला. तर शौर्य बारगजे व वेदांत राऊत यांनी द्वितीय तर सुदर्शन शिंदे याने तृतीय पारितोषिक मिळविले. या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन शाळेतील विज्ञान शिक्षक तट सर तसेच त्यांचे सहकारी यांनी केले.वरील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे जीवन विकास शिक्षण मंडळ संस्थेचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे, सचिव जी.बी.गदळे, सहसचिव उपेंद्र कोकीळ, कोषाध्यक्ष फजीलोद्दीन काजी,संचालक नारायण अण्णा अंधारे,शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शैलाताई इंगळे, शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे तसेच शाळेतील सर्व शिक्षक वृंद यांनी अभिनंदन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे यांनी केले.

# केज येथे श्रीकृष्ण मंदिर भूमिपूजन व १०८ कुंडी महा विष्णु महायज्ञाचे आयोजन

केज/प्रतिनिधी

केज शहरातील भगवान श्रीकृष्ण आश्रम,बीड रोड येथे श्रीकृष्ण मंदिराच्या भव्य भूमिपूजन सोहळ्या निमित्त १०८ कुंडी भव्य महाविष्णु याग,तसेच ह.भ.प.रामराव ढोक महाराज यांच्या ओजस्वी वाणीतून संगीत रामकथा व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.हा धार्मिक कार्यक्रम बुधवार दि.११ मार्च २०२६ ते गुरुवार दि.१९ मार्च २०२६ या कालावधीत संपन्न होणार आहे.

या महा विष्णु यज्ञ,राम कथा व किर्तन सोहळ्या साठी हिमाचल प्रदेश येथील महंत तपस्वी परमहंस श्री १००८ स्वामी चिन्मय पुरीजी महाराज यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.संगीत रामकथा प्रवक्ते श्री.ह.भ. प. रामराव महाराज ढोक करणार असून दररोज सकाळी ८ ते ११ वाजता महाविष्णु १०८ कुंडी यज्ञ दुपारी २ ते ५ संगीत तुलसी रामायण कथा,

सायंकाळी धार्मिक विधी, कीर्तन व हरि जागराचे आयोजन करण्यात आले आहे.कार्यक्रमात विविध संत-महात्म्यांची कीर्तन सेवा लाभणार असून भाविकांसाठी



दररोज महाप्रसाद व अन्नदानाची व्यवस्था करण्यात आली आहे.परिसरातील सर्व भाविकांनी व धर्मप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या पुण्यलाभाचा लाभ घ्यावा,असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.या कार्यक्रमाचे आयोजन भागवत भुषण श्री.ह.भ.प.केशव महाराज शास्त्री व श्रीकृष्ण आश्रम परिवार यांच्या वतीने करण्यात आले असून अधिक माहितीसाठी भाविकांनी आयोजकांशी संपर्क साधावा,असेही कळविण्यात आले आहे. दरम्यान यज्ञ मंडपाचे काम पुर्णत्वास आले असून राजस्थान येथील कारागीर मंडप उभारणी करण्यात मग्न आहेत. १०८ यज्ञ कुंड तयार करण्यात आले असून त्यांना गोमूत्र,गोमय, मृतीका यांनी सारवण करुन रंगरंगोटी करण्यात येत आहे.श्रीराम कथा मंडपाचे काम पुर्णत्वास आले असून भोजन मंडपाचे काम गतीने सुरू आहे अशी माहिती भगवान श्री कृष्ण आश्रम येथील आयोजक भागवत भुषण ह.भ.प. श्री. केशव महाराज शास्त्री यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले आहे.

# कार्यकर्त्यांनी सामाजिक जाणिवांची जपवणूक करावी

## शैक्षणिक विकासासाठी गट-तट बाजूला ठेवावेत-आ.सुरेश धस

आष्टी (प्रतिनिधी)

उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या दुर्दैवी निधनामुळे आपला वाढदिवस साधेपणाने आणि सामाजिक उपक्रम राबवून साजरा करावा, असे आवाहन आ. सुरेश धस यांनी केले होते. त्यांच्या या आवाहनाला प्रतिसाद देत केळसांगवी येथील माजी सरपंच गंगाधर पडोळे यांनी गरजू शालेय विद्यार्थी-विद्यार्थिनींना सायकलींचे वाटप करून स्तुत्य उपक्रम राबविला. या सायकल वितरण समारंभात मार्गदर्शन करताना आ. सुरेश धस यांनी कार्यकर्त्यांनी सामाजिक भान जपत गावाच्या शैक्षणिक विकासासाठी गट-तट बाजूला ठेवून एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन केले.

केळसांगवी येथील जिल्हा परिषद शाळेत आयोजित या कार्यक्रमात बोलताना आ. धस म्हणाले, माझ्या वाढदिवसानिमित्त होणाऱ्या वाटप कार्यक्रमांमध्ये मी सहसा सहभागी होत नाही; मात्र गरजू विद्यार्थ्यांना सायकली देणे हा अत्यंत उपयुक्त आणि स्तुत्य उपक्रम असल्याने मी या कार्यक्रमाला उपस्थित राहिलो आहे. जिल्हा परिषद शाळा या गोरगरीब विद्यार्थ्यांचे मंदिर आहे. या शाळा टिकल्या पाहिजेत, यासाठी समाजाने पुढाकार घेतला पाहिजे. ते पुढे म्हणाले की, ग्रामीण भागात वस्त्यांमध्ये विखुरलेले वास्तव्य वाढल्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेत ये-जा करण्यासाठी सायकलींची मोठी गरज असते. या पार्श्वभूमीवर गंगाधर पडोळे यांनी घेतलेला पुढाकार कौतुकास्पद आहे. सुरुवातीपासूनच जिल्हा परिषद शिक्षण व्यवस्था अधिक सक्षम व अत्याधुनिक करण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. गावोगावी शाळा खोल्यांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला असून गुणवत्ता अभियानांतर्गत विशेष प्रयत्नांमुळे शैक्षणिक दर्जात लक्षणीय सुधारणा झाली आहे. येत्या काळात याचे आणखी सकारात्मक परिणाम दिसून येतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सध्याच्या डिजिटल युगाचा उल्लेख करताना आ. धस म्हणाले, एआयच्या स्पर्धेच्या काळात विद्यार्थ्यांना आधुनिक ज्ञान मिळणे अत्यावश्यक आहे. मात्र पालकांनी मुलांच्या हातात मोबाईल देताना सजग राहावे. मोबाईलचे फायदे असले तरी त्याचा दुरुपयोग टाळणे गरजेचे आहे. तसेच स्थानिक कार्यकर्त्यांनी राजकीय भेद बाजूला ठेवून गावातील शैक्षणिक वातावरण अधिक सुदृढ करण्यासाठी प्रयत्न




करावेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना माजी सरपंच गंगाधर पडोळे म्हणाले, दरवर्षी आमदार धस यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांद्वारे साजरा करण्याची परंपरा आहे. यावर्षी अनावश्यक खर्च टाळून गरजू विद्यार्थ्यांना सायकली देण्याचा निर्णय घेतला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहून समाधान वाटते. पुढेही शैक्षणिक क्षेत्रात असेच उपक्रम राबवण्याचा मानस आहे. यावेळी संदीप खकाळ यांनी आ. धस यांनी विधानभवनात मांडलेल्या विचारांचा उल्लेख करत शेतकऱ्यांनी एआय-आधारित शेतीकडे वळावे, असे सांगितले. जेष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे यांनीही समायोजित भाषणातून उपक्रमाचे कौतुक केले.

या कार्यक्रमास भाजपा तालुकाध्यक्ष रमेश गावडे, अजित घुले, राम धुमाळ, बिभीषण पडोळे, ॲड. बाळासाहेब मोरे, दीपक सोनवणे, गौतम आजबे, चेअरमन विठ्ठल शेंबडे, माजी सरपंच महादेव पडोळे, पोपट नरवडे, अरुण पडोळे, गोरख सोनवणे, नवनाथ वाघुले, अंगद पडोळे, रामेश्वर पडोळे, बाळासाहेब पडोळे, बाबासाहेब पडोळे, एकनाथ पडोळे, शिवदास पडोळे, सचिन पडोळे यांच्यासह पत्रकार प्रविण पोकळे, गणेश दळवी, सचिन रानडे, अविशांत कुमकर, शरद गर्जे आदी मान्यवर उपस्थित होते.तसेच शाळेचे मुख्याध्यापक जगन्नाथ भगत, श्रीम. आशा ठाकर, श्रीम. जया चौधरी, श्रीम. सुनिता वाळके, श्रीम. सुप्रिया हिंगे, शहाजी तोतरे, संदीप जगताप यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदर्श शिक्षक बाळासाहेब तळेकर यांनी केले तर आभार प्रदर्शन आदर्श मुख्याध्यापक जगन्नाथ भगत यांनी मानले. केळसांगवी येथे पार पडलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांकडून या सामाजिक कार्याचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

## नृत्य स्पर्धेमध्ये स्वामी विवेकानंद शाळेला प्रथम व द्वितीय पारितोषिक

केज/प्रतिनिधी

शिवजयंती निमित्त घेण्यात आलेल्या महाराज प्रतिष्ठान केज आयोजित शिव जन्मोत्सव २०२६ निमित्त तालुकास्तरीय नृत्य स्पर्धेमध्ये स्वामी विवेकानंद विद्यामंदिर मा.वि.केज शाळेने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळवले बक्षीसाचे स्वरूप सन्मानचिन्ह व रोख रक्कम ११००० रुपये तसेच पत्रकार संघा मार्फत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई, राष्ट्रीय पत्रकार संघ केज, पुरोगामी पत्रकार संघ व सह्याद्री पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या शालेय तालुकास्तरीय नृत्यस्पर्धा - २०२६ मध्ये स्वामी विवेकानंद विद्यामंदिर मा.वि.केज शाळेने द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळवले बक्षिसाचे स्वरूप सन्मानचिन्ह व रोख रक्कम ३८०० रुपये या दोन्ही स्पर्धेत अनुक्रमे ४० व ३० शाळांनी सहभाग नोंदवला होता या




दोन्ही स्पर्धेत शाळेतील सातवी अ वर्गाच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राची लोकपरंपरा शेतकरी लोकगीत सादर केले या स्पर्धेत सहभागी विद्यार्थी अपूर्वा सोनवणे, संस्कृती गायकवाड, किशोरी मुळे,तेजस्विनी कापरे,सृष्टी अडसूळ, समृद्धी नेहरकर,स्नेहा सोनवणे,नंदिनी सपाटे, श्रेया धपाटे,क्रांती धपाटे, आरती तपसे,प्रांजली घोळवे,श्रुती सावंत,प्राची ढोबळे,आरती फरके, हिंदवी खराडे,श्रावणी लोंढे,समर्थ येळवे,महेश चवरे,प्रसाद ढोबळे या विद्यार्थ्यांचा सहभाग होता या विद्यार्थ्यांना वर्गशिक्षक तथा सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे सर यांनी मार्गदर्शन केले. सांस्कृतिक विभाग सहाय्यक कल्याण आदमाने,दादासाहेब गायकवाड,शिवाजी समुद्रे यांचे सहकार्य लाभले.वरील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे जीवन विकास शिक्षण मंडळ संस्थेचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे, सचिव जी.बी.गदळे, सहसचिव उपेंद्र कोकीळ, कोषाध्यक्ष फजीलोद्दीन काजी,संचालक नारायण अण्णा अंधारे,शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शैलाताई इंगळे, शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे तसेच शाळेतील सर्व शिक्षक वृंद यांनी अभिनंदन केले आहे.

## कासेवाडीत आजपासून जिल्हास्तरीय नेतृत्वगुण विकास शिबिर

### स्वयंसेवकांमध्ये राष्ट्रसेवेची जाणीव जागृत करण्याचा संकल्प

आष्टी - (प्रतिनिधी) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या मार्गदर्शनाखाली तसेच आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित ड. बी. डी. हंबर्डे महाविद्यालय, आष्टी यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे कासेवाडी, ता. आष्टी, जि. बीड येथे जिल्हा नेतृत्वगुण विकास उद्बोधन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

दि. ०५ ते ०९ मार्च २०२६ या कालावधीत होणाऱ्या या पाच दिवसीय शिबिरात जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतील राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) स्वयंसेवक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. युवकांमध्ये नेतृत्वगुण, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा जागृत करणे हा शिबिराचा मुख्य उद्देश आहे.शिबिराच्या उद्घाटन समारंभास आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. किशोर (नाना) हंबर्डे अध्यक्षस्थानी उपस्थित राहणार आहेत. तर विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना संचालक मा. सोमिनाथ खाडे उद्घाटक म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. विविध क्षेत्रातील तज्ञ व मान्यवरांची उपस्थितीही लाभणार असून शिबिराची सुरुवात उत्साहात होणार आहे.शिबिरामध्ये नेतृत्व विकास, सामाजिक जाणीव, ग्रामविकास, संविधान मूल्ये, मानसिक आरोग्य, उद्योजकता, आपत्ती व्यवस्थापन आदी महत्त्वपूर्ण विषयांवर व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. स्वयंसेवकांना केवळ सैद्धांतिक ज्ञान नव्हे तर प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी मिळावी यासाठी ग्रामसंवाद, श्रमदान, ग्रामस्वच्छता, ग्राम सर्वेक्षण यांसारखे उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

दि. ०५ मार्च रोजी सायंकाळी पद्मश्री चैत्रामजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष शेतकरी संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून ग्रामीण प्रश्नांवर थेट संवाद साधण्याची संधी स्वयंसेवकांना मिळणार आहे. यामुळे ग्रामीण भागातील वास्तव, अडचणी आणि संधी यांची प्रत्यक्ष जाण विद्यार्थ्यांना होणार आहे.

शिबिरादरम्यान सांस्कृतिक कार्यक्रम, समूहचर्चा, देशभक्तीपर उपक्रम आणि प्रेरणादायी सत्रांद्वारे स्वयंसेवकांच्या व्यक्तिमत्त्व विकासावर भर देण्यात येणार आहे. शिस्त, संघभावना आणि सामाजिक उत्तरदायित्व या मूल्यांची रुजवणूक करण्यासाठी विविध स्पर्धा व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोपानराव निंबोरे यांनी शिबिराच्या उद्देशाविषयी माहिती देताना सांगितले की, या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, सामाजिक जाणीव आणि राष्ट्रसेवेची भावना विकसित करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी उपप्राचार्य बाबासाहेब मुटकुळे, उपप्राचार्य अविनाश कंदले, पर्यवेक्षक अशोक भोगाडे, जिल्हा समन्वयक रवी सातभाई, कार्यक्रम अधिकारी सुहास गोपणे, नॅक समन्वयक निवृत्ती नानवटे, भगवान वाघमारे, सखाराम वाढरे, रमेश भारूडकर, संतोष वनगुजरे तसेच सर्व महाविद्यालयीन कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक परिश्रम घेत आहेत. कासेवाडी येथे होत असलेले हे जिल्हास्तरीय शिबिर युवकांना सकारात्मक दिशा देणारे ठरणार असून ग्रामीण भागात नेतृत्वाची नवी पिढी घडविण्याचा महत्त्वाकांक्षी प्रयत्न मानला जात आहे.

# आष्टीत रंगली विकासाची ‘धुलवड’

## पाणी प्रश्नासाठी माजी आ.भीमराव धोंडे आणि माजी आ.बाळासाहेब आजबे एकत्र

आष्टी (प्रतिनिधी)

रंगांचा सण असलेल्या धुलीवंदनाच्या दिवशी आष्टी तालुक्यात विकासाच्या प्रश्नावर एक वेगळीच ‘धुलवड’ रंगली. आष्टी, पाटोदा आणि शिरूर या दुष्काळी पट्ट्यातील शाश्वत पाणीप्रश्न सोडवण्यासाठी माजी आमदार भीमराव धोंडे आणि माजी आमदार बाळासाहेब आजबे हे दोन नेते एकत्र आले. या ऐतिहासिक बैठकीमुळे मतदारसंघातील राजकीय आणि सामाजिक समीकरणांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. आष्टी येथील भगवान महाविद्यालयात मंगळवार, दि. ३ मार्च रोजी आयोजित विशेष बैठकीत तिन्ही तालुक्यांतील शेतकरी, कार्यकर्ते आणि विविध पक्षांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पाणीप्रश्नावर सखोल आणि अभ्यासपूर्ण चर्चा करत शाश्वत सिंचन हाच दुष्काळमुक्तीचा एकमेव पर्याय असल्याचा एकमताने निष्कर्ष काढण्यात आला.

सिंचनाशिवाय पर्याय नाही - माजी आ. भीमराव धोंडे

यावेळी बोलताना माजी आ. भीमराव धोंडे यांनी भविष्यातील संभाव्य संकटावर स्पष्ट भाष्य केले. बीड हा ऊसतोड कामगारांचा जिल्हा आहे. भविष्यात ऊसतोडीसाठी हार्वेस्टरचा वापर वाढल्यास हजारो मजुरांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळू शकते. आधीच कमी पर्जन्यमानामुळे आपले तालुके दुष्काळी म्हणून ओळखले जातात. त्यामुळे सिंचनाच्या सुविधा निर्माण करून कायमस्वरूपी पाणी उपलब्ध करणे ही काळाची गरज आहे, असे ते म्हणाले. या प्रश्नासाठी सर्व संबंधित मंत्र्यांची भेट घेणार असल्याचे सांगत त्यांनी न भूतो न भविष्यती अशी लोकचळवळ उभारण्याचा इशारा दिला. जनतेच्या व्यापक पाठिंब्यामुळे हा प्रश्न अंतिम टप्प्यापर्यंत नेऊन यशस्वी करू, असा ठाम विश्वासही त्यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्याकडून सकारात्मक प्रतिसाद मिळेल, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.

सत्तेत असलो तरी आंदोलनाची तयारी - माजी आ. बाळासाहेब आजबे



माजी आ. बाळासाहेब आजबे यांनी पाणीप्रश्नावर तांत्रिक व व्यवहार्य मांडणी केली. जायकवाडी धरणातून काही भागाला पाणी उपलब्ध करून देणे, खुंटेफळ प्रकल्पातील ४ टीएमसी पाणी आणि सीना प्रकल्पाच्या आवर्तनातून पाणी मिळवणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रशासकीय पातळीवर योग्य पाठपुरावा करून हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत. सत्तेत असलो तरी शेतकऱ्यांच्या हितासाठी रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याची आमची पूर्ण तयारी आहे, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

या बैठकीस राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष दिपक घुमरे (पाटोदा), काकासाहेब शिंदे (आष्टी), माजी जि.प. सदस्य रामराव खेडकर, पराग आप्पासाहेब राख, पाटोदा कृ.उ. बाजार समितीचे उपसभापती पांडुरंग नागरगोजे, ॲड. हनुमंत थोरवे, आरपीआयचे अशोक साळवे, नियामत बेग, अनिल जायभाये, सतीश मामा झगडे, दादा जगताप, माऊली वाघ, सुदाम काका झिंजुर्के, हरिभाऊ जंजिरे, संजय विधाते, अंकुश मुंडे, संभाजी जगताप, बजरंग कर्डिले, नानाभाऊ वाडेकर, संजय चंदनशिव, सोपान गाडे, आबासाहेब तावरे, आदिनाथ गवळी, भागवत वारे, बबन सांगळे, बाळासाहेब शेकडे, विकास वनवे, गणेश सांगळे, आदेश निमोनकर, सचिन नालकोल, निलेश सोनवणे, सय्यद शहाबुद्दीन, चंद्रशेखर साके, संजय नालकोल, महारुद्र खेडकर, धोंडीबा सांगळे, सूर्यभान सांगळे, दीपक बोराडे यांच्यासह पाटोदा व शिरूर तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

एरवी राजकीय आखाड्यात वेगवेगळ्या भूमिका घेणारे हे दोन बडे नेते मतदारसंघाच्या हितासाठी एकत्र आल्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. या निर्णयामुळे भविष्यातील राजकीय आणि सामाजिक समीकरणांमध्ये बदल होण्याची शक्यता राजकीय विश्लेषकांकडून वर्तवली जात आहे. बैठकीच्या शेवटी दोन्ही नेत्यांनी व उपस्थित कार्यकर्त्यांनी एकमेकांना रंग लावून विकासाच्या धुलीवंदनाचा संदेश दिला. आष्टी, पाटोदा आणि शिरूर हे तालुके सिंचनाच्या बाबतीत मागासलेले मानले जातात. भविष्यातील यांत्रिकीकरणामुळे ऊसतोड कामगारांसमोर रोजगाराचे संकट उभे राहू शकते. या पार्श्वभूमीवर विविध प्रकल्पांद्वारे या दुष्काळी पट्ट्यात पाणी आणणे ही काळाची गरज असल्याचे बैठकीत अधोरेखित करण्यात आले. मंत्रिमंडळाशी लवकरच चर्चा करून या विकास योजनेला मूर्त स्वरूप देण्यासाठी आणि शेतकऱ्यांचा वनवास कायमचा संपवण्यासाठी शेवटपर्यंत लढा देण्याचा निर्धार माजी आ. भीमराव धोंडे आणि माजी आ. बाळासाहेब आजबे यांनी व्यक्त केला. विकासाच्या या धुलवडीमुळे आता मतदारसंघातील जनतेच्या अपेक्षा उंचावल्या असून, पाणीप्रश्नावर ठोस निर्णयाची प्रतीक्षा सर्वांनाच लागली आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# सुरेश धस यांची विधानसभेत आक्रमक भूमिका

## आखाती युद्धाचा फटका; कांदा,द्राक्षे-बेदाणा निर्यात ठप्प,शेतकऱ्यांना तातडीच्या मदतीची मागणी




आष्टी (प्रतिनिधी)

महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२६ दरम्यान आमदार सुरेश धस यांनी आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीचा राज्यातील कृषी निर्यात व्यापारावर होत असलेला गंभीर परिणाम लक्षवेधी सूचनेद्वारे सभागृहात मांडला. कांदा, द्राक्षे आणि बेदाणा या प्रमुख निर्यात पिकांच्या व्यापाराला मोठा फटका बसत असून शेतकरी व व्यापाऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले असल्याची ठळक बाब त्यांनी अधोरेखित केली.

धस यांनी सांगितले की, आखाती देश हे महाराष्ट्रातील कृषी उत्पादनांसाठी अत्यंत महत्त्वाची बाजारपेठ आहे. विशेषतः नाशिक, संगमनेर, तासगाव, पिंपळगाव बसवंत या भागांतून मोठ्या प्रमाणावर कांदा, द्राक्षे आणि बेदाणा निर्यात होतो. मात्र सध्याच्या युद्धपरिस्थितीमुळे निर्यात प्रक्रियेत अडथळे निर्माण झाले आहेत. माल बंदरांवर अडकून पडत आहे, तर काही ठिकाणी निर्यात आदेश रद्द होत आहेत. परिणामी स्थानिक बाजारपेठेत आवक वाढून भाव कोसळत आहेत. यामुळे शेतकऱ्यांचे उत्पादन खर्चही निघत नसल्याची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने तातडीने हस्तक्षेप करून शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा द्यावा, निर्यात प्रोत्साहनासाठी विशेष पॅकेज जाहीर करावे तसेच साठवणूक व प्रक्रिया उद्योगांना मदत करावी, अशी जोरदार मागणी धस यांनी केली. अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असल्यामुळे तत्काळ बैठक घेणे शक्य नसले तरी अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर संबंधित मंत्र्यांनी तातडीने बैठक बोलावून ठोस निर्णय घ्यावेत, अशी विनंती त्यांनी सभागृहात केली. यावर संबंधित मंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत लवकरच बैठक घेण्याचे आश्वासन दिल्याचे धस यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, चीनमार्गे अफगाणिस्तानातून मोठ्या प्रमाणावर बोगस बेदाणा राज्यात दाखल होत असल्याचा गंभीर मुद्दाही त्यांनी उपस्थित केला. पिंपळगाव बसवंत येथील प्रमुख बाजार समिती तसेच तासगाव परिसरात संशयास्पद मालाची आवक झाल्याचे निदर्शनास आणून देत या प्रकारामुळे स्थानिक उत्पादकांचे नुकसान होत असल्याचे त्यांनी सांगितले. संबंधितांवर गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी ठाम मागणीही त्यांनी केली.

या संपूर्ण प्रश्नामुळे राज्यातील कृषी व व्यापार क्षेत्रात चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून सरकारच्या पुढील निर्णयाकडे शेतकरी, व्यापारी व निर्यातदारांचे लक्ष लागले आहे. आगामी बैठकीत ठोस उपाययोजना जाहीर झाल्यास दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.




# मा.आ.भीमराव धोंडे यांच्या शुभहस्ते सिद्धार्थ विष्णू दहिफळे याचा सत्कार

एन.एम.एम.एस.परीक्षेत यशस्वी भरारी

आष्टी - (राजेंद्र लाड) शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित पंडित जवाहरलाल नेहरू प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, आष्टी येथील विद्यार्थ्यांनी एन.एम.एम.एस. परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत विद्यालयाचा नावलौकिक वाढविला आहे. या परीक्षेत तब्बल ११२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून त्यांच्या यशाबद्दल विद्यार्थ्यांचा व पालकांचा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. याप्रसंगी आष्टी विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते मा. आ. भीमरावजी धोंडे साहेब प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या शुभहस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन व स्मृतिचिन्ह प्रदान करून गौरविण्यात आले.

याप्रसंगी मा. आ. भीमराव धोंडे यांच्या शुभहस्ते सिद्धार्थ विष्णू दहिफळे याचा सत्कार करण्यात आला. यावेळी मातापालक सौ. आशा विष्णू दहिफळे या उपस्थित होत्या. सिद्धार्थ याच्या यशाबद्दल समाधान व्यक्त करत त्यांनी सिद्धार्थ व सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. यश हीच खरी प्रेरणा असून विद्यार्थ्यांचे सातत्य, मेहनत आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळेच असे यश शक्य होते, असे प्रतिपादन मा. आ. भीमराव धोंडे यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाला संस्थेचे सर्व प्रशासकीय अधिकारी, केंद्रप्रमुख त्रिंबक दिंडे, शिवदास विधाते, माऊली बोडखे, दिपक भुजबळ, सरपंच विष्णू दहिफळे, पत्रकार अविशांत कुमकर, आण्णासाहेब साबळे, प्राचार्य सुरेश बोडखे, मार्गदर्शक शिक्षक तसेच महाविद्यालयातील सर्व कर्मचारीवृंद उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या पाल्यांच्या यशाचा आनंद साजरा करत होते. यावेळी शिक्षकांनीही विद्यार्थ्यांच्या जिद्दीचे व परिश्रमांचे कौतुक केले. विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखत यंदाही मोठ्या संख्येने विद्यार्थी उत्तीर्ण झाल्याने संस्थेच्या कार्याचा गौरव वाढला आहे. कार्यक्रमाचे आयोजन शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले होते. एकूणच आष्टीतील या यशोत्सवामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून विद्यालयाच्या उज्ज्वल भविष्यासाठी हा सोहळा प्रेरणादायी ठरला.

# एकता फाउंडेशन चे राज्यस्तरीय उत्कृष्ट साहित्यकृती पुरस्कार जाहीर

## पाडळीतील संमेलनात होणार वितरण

मानूर ।प्रतिनिधी

मराठवाड्यासह राज्यभरातील ग्रामीण भागाचा सामाजिक परिपोष समृध्द व्हावा यासाठी साहित्य, संस्कृती, शिक्षण, समाज व पर्यावरण यांसारख्या विविध क्षेत्रात कसलाही भेदभाव न करता सर्वांना सोबत घेऊन अखंड कार्य करत असलेल्या एकता फाऊंडेशन च्या वतीने साहित्य संमेलनांच्या माध्यमातून दरवर्षी उत्कृष्ट साहित्यकृतींना राज्यस्तरीय पुरस्कार दिले जातात. त्या अनुषंगाने सन २०२५ चे साहित्य पुरस्कार यंदा शिरूर का. तालुक्यातील पाडळी येथील ८ व्या एकता मराठी साहित्य संमेलनात देण्यात येणार असल्याचे एकता कोअर कमिटीतील पदाधिकाऱ्यांनी सांगितले.पुरस्कार प्राप्त लेखक/साहित्यकृती पुढील प्रमाणे, कै.विश्वनाथ यादव कराड (गुरूजी) राज्यस्तरीय उत्कृष्ट कथासंग्रह पुरस्कार पुणे येथील शरद अत्रे यांच्या 'जगावेगळी' व अहिल्यानगर चे गोकुळ गायकवाड यांच्या 'ताटातूट' या कथासंग्रहांना विभागून. कै.विश्वनाथ शंकरराव पवार (से.नि.पोस्टमास्तर) राज्यस्तरीय उत्कृष्ट काव्यसंग्रह पुरस्कार डॉ.विजयालक्ष्मी वानखेडे (बुलढाणा) यांच्या 'बारूद' कवितासंग्रहाला. स्वा.सै.गणपतराव बडे सार्व.वाचनालय लोणी ता.शिरूर का.जि.बीड राज्यस्तरीय उत्कृष्ट कादंबरी पुरस्कार आशा नेगी हिरेमठ (पिंपरी चिंचवड) यांच्या 'ब्युटी ऑफ लाईफ' कादंबरीस. कै.काशिनाथ आश्रुबा शिंदे (सर) राज्यस्तरीय उत्कृष्ट बालसाहित्य पुरस्कार डॉ.श्रीकांत पाटील (कोल्हापूर) यांच्या 'रंगतदार नाट्यछटा' या पुस्तकाला. कै.वच्छलाबाई बाबासाहेब सानप (आदर्श माता) राज्यस्तरीय उत्कृष्ट ललित लेखन पुरस्कार मुग्धा बोरकर (गोवा) यांच्या 'कोलाज' व डॉ.मोहन खडसे (अकोला) यांच्या 'गुपित आनंदाचं' या पुस्तकाला विभागून. कै.परमेश्वर भागुजी कैतके (लाईनमन) राज्यस्तरीय उत्कृष्ट संशोधन-संपादन साहित्य पुरस्कार डॉ.सौ.रेखा ढगे (धाराशीव) यांच्या 'सावित्रीच्या कविता' साहित्यकृतीस आणि कै.लताबाई पुरूषोत्तम बारडकर राज्यस्तरीय उत्कृष्ट संकिर्ण साहित्य पुरस्कार प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये (परभणी) यांच्या 'तुकाराम नीती' या पुस्तकाला जाहीर झाल्याचे एकता पुरस्कार निवड समितीने कळवले आहे.कथाकार प्रा.डॉ.भास्कर बडे यांच्या अध्यक्षतेखालील पुस्तक परिक्षण समितीत एकताचे प्रदेश संघटक देवीदास शिंदे व एकताच्या सातारा जिल्हाध्यक्षा श्रीम.रंजना सानप (संकिर्ण विभाग), युवक प्रदेश निमंत्रक इम्रान शेख व एकताच्या नांदेड जिल्हाध्यक्षा एड.सुचिता गिते (कविता विभाग), द.मा.माने-शिरूर ताजबंद व एकताचे पाथर्डी तालुकाध्यक्ष राजेंद्र उदारे (कादंबरी विभाग), एकताचे लातूर प्रतिनिधी जी.जी.कांबळे आणि एकताचे शेवगाव तालुकाध्यक्ष प्रदीप बोडखे (कथासंग्रह विभाग), एकताचे शेवगाव तालुका सल्लागार एड.प्रताप वाघुंबरे व एकताचे पाटोदा तालुका सहसचिव बाळासाहेब नागरगोजे (ललित विभाग), एकताचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष प्राचार्य डॉ.प्रकाश वाकळे व परभणी जिल्हाध्यक्ष पु.ना.बारडकर (बालसाहित्य विभाग), एकताच्या मराठवाडा विभागीय महिला आघाडी प्रमुख प्रा.डॉ.संगीता घुगे व मराठवाडा विभागीय सचिव अंबादास केदार (संशोधन-संपादन विभाग) यांचा समावेश होता. पुस्तक परिक्षण समितीच्या निकालावर एकता कोअर कमिटीतील पदाधिकाऱ्यांनी चर्चेअंती शिक्कामोर्तब केले.

# आई वडीलांच्या वचनाचे पालन केल्यास आपण केलेला निश्चय पूर्ण होतो - ह.भ.प.इंदुवासीनी महाराज

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील देवगांव येथील माजी पोलीस पाटील कै. बाबुराव माधवराव मुंडे यांची २७ वी तर कै. लक्ष्मीबाई बाबुराव मुंडे (पाटील) यांच्या ९ व्या पुण्यतिथी कार्यक्रमा प्रसंगी बोलताना ह.भ.प.

त्रिविक्रमानंद शास्त्री इंदुवासिनी (पिंपळनेरकर) महाराज म्हणाले की,कै.लक्ष्मीबाई बाबुराव मुंडे यांची तीनही मुले व दोन मुली खुप भाग्यवान आहेत.त्यांनी जिवंतपणी ही आई वडीलांची सेवा करुन पून्हा त्यांच्या पश्चातही गेल्या २७ वर्षापासुन आपल्या आई वडीलांची पुण्यतीथी करुन मानवता जागृत वचनाचे पालन करत आहेत.त्यामुळे त्यांनी केलेला निश्चय हा पूर्ण होतो असे महाराज यावेळी म्हणाले.या कार्यक्रमासाठी उपस्थित असलेल्या सर्व महाराज मंडळीनी कै.आण्णा व आक्का यांना विनम्र अभिवादन करुन विक्रमबप्पा मुंडे,शशिकांत नाना मुंडे, रमाकांत बापू मुंडे व दोन मुलींना आशिर्वाद दिले. केज तालुक्यातील देवगांव येथील माजी पोलीस पाटील कै. बाबुराव माधवराव मुंडे यांची २७ वी तर कै. लक्ष्मीबाई बाबुराव मुंडे (पाटील) यांच्या ९ व्या पुण्यतिथीचा कार्यक्रम दि.२मार्च सोमवार रोजी आयोजित केला होता. यावेळी ह.भ.प. त्रिविक्रमानंद शास्त्री इंदुवासिनी पिंपळनेरकर

यांचे सुश्राव्य असे कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते.या ठिकाणी विक्रमबप्पा मुंडे शशिकांत नाना मुंडे, रमाकांत बापू मुंडे यांनी कै.आण्णा आक्कांच्या प्रतिमेचे पुजन केले. यावेळी ह.भ.प.रतन महाराज सासुरेकर, ह.भ.प.श्रीराम महाराज विडेकर,ह.भ.प.भगवान महाराज वरपगांवकर, ह.भ.प.पुरुषोत्तम महाराज शास्त्री आंधळेवाडी,ह.भ.प. तुकाराम महाराज आंधळेवाडी,ह.भ.प. ज्ञानोबा माऊली महाराज आ.बरड,ह.भ.प.



नारायण महाराज उत्रेश्वर पिंप्री,ह.भ.प.केशव महाराज शास्त्री टाकळी, ह.भ.प.लक्ष्मण महाराज इनामदार येवता,ह.भ.प.

तुकाराम महाराज लाड बरड या महाराज मंडळींनी कै.बाबुराव (आण्णा) मुंडे व कै.लक्ष्मीआक्का विनम्र अभिवादन करुन त्यांच्या तिन्ही मुला मुलींना आशिर्वाद दिले.या कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या सर्व महाराज मंडळींचा व भजनी मडंळी व आलेले पाहुणे मंडळी राजेश कराड, केंद्रे,रमेशराव आडसकर, महादेव आप्पा चौरे, अंकुशराव इंगळे,संतोष हांगे,त्रिंबकराव हांगे,दत्ता धस,बप्पासाहेब घुगे, सुनिल गलांडे सह अनेक मान्यवरांचा सत्कार शशिकांत नाना मुंडे, विजयकांत मुंडे,रमाकांत बापू मुंडे,भास्कर मुंडे व अतुल मुंडे,अमित मुंडे, मधुर मुंडे यांनी केला. यावेळी केजच्या माजी आ.सौ.संगीताताई ठोंबरे यांचा सत्कार सौ. उषाताई मुंडे यांनी केला. या कार्यक्रमासाठी केज तालुक्यातील व विडा जि.प.सर्कल मधील अनेक गावातील नागरीक मोठ्या संख्येंने उपस्थित होते.या कार्यक्रमाला आलेल्या सर्व पाहुण्यांचे व ग्रामस्थांचे आभार ह.भ.प.केशव शास्त्री महाराज घुलेटाकळीकर यांनी मुंडे परीवाराच्या वतीने मानले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विजयकांत मुंडे,अमित मुंडे,अतुल मुंडे,मधुर मुंडे, यांनी परिश्रम घेतले.महाप्रसादाच्या पंगतीने या कार्यक्रमाची सांगता झाली.

# चि.शिवनाथ व चि.सौ.कां.तन्वी यांच्या आज होणाऱ्या शुभविवाहास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे-गौतम नाना आजबे

आष्टी - (राजेंद्र लाड)

आष्टी तालुक्यातील रा. शिराळ येथील गौतम राधाकिसन आजबे यांचे चिरंजीव शिवनाथ तसेच रा. भवरवाडी (किन्ही) ता. आष्टी येथील भास्करराव नामदेव भवर यांची कन्या चि. सौ. कां. तन्वी यांचा शुभविवाह सोहळा आज गुरुवार दिनांक ५ मार्च २०२६ रोजी दुपारी १२.५५ वाजता मंगलमय वातावरणात पार पडणार आहे. या शुभविवाहास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन गौतम नाना आजबे (मा. उपसभापती कृषी उत्पन्न बाजार समिती कडा) यांनी केले आहे.

हा विवाह सोहळा आष्टी येथील मोरेश्वर मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आला असून, या मंगल प्रसंगी नातेवाईक, मित्रपरिवार आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. दोन्ही कुटुंबीयांनी विवाह सोहळ्याची जय्यत तयारी केली असून परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

विवाह सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून लोकनेते मा. सुरेश आण्णा धस (माजी मंत्री तथा विधान सभा सदस्य) यांची उपस्थिती लाभणार असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून माजी आ. साहेबराव दरेकर नाना, माजी आ. भीमराव धोंडे साहेब, माजी आ. बाळासाहेब आजबे काका, मा. जिल्हा परिषद सदस्य देविदास आबा धस हे उपस्थित राहणार आहेत. या सर्वांच्या उपस्थितीमुळे सोहळ्याला विशेष मान प्राप्त होणार आहे.

वधू-वरांच्या स्वागतासाठी आकर्षक सभामंडपाची रचना करण्यात आली असून, धार्मिक परंपरा जपत पारंपरिक पद्धतीने विवाह विधी पार पडणार आहेत. दोन्ही कुटुंबे सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय असल्याने समाजातील विविध स्तरातील मान्यवर या सोहळ्यास उपस्थित राहणार आहेत. समस्त आजबे व भवर परिवाराच्या



वतीने सर्व आप्तेष्ट व हितचिंतकांना सहकुटुंब उपस्थित राहून वधू-वरांना आशीर्वाद द्यावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. शिवनाथ व तन्वी यांच्या भावी आयुष्यासाठी सर्वत्र शुभेच्छांचा वर्षाव होत असून त्यांच्या वैवाहिक जीवनासाठी मंगलमय शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

# मदनबाई लोढा यांचे संथारा व्रतामध्ये निधन

## प्रेमचंद, दिलीप, अशोक लोढा यांना मातृशोक

बीड प्रतिनिधी

माजी आमदार स्व. चांदमल लोढा यांच्या धर्मपत्नी श्रीमती मदनबाई चांदमल लोढा (वय ८९) यांचे ३ मार्च मंगळवार रोजी रात्री साडेआठ वाजे दरम्यान निधन झाले. त्यांनी संथारा व्रत धारण केले होते. त्यांच्या पार्थिवावर ४ मार्च बुधवारी मोंढा रोडवरील अमरधाम येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.



४ मार्च रोजी सकाळी १०:३० वाजता त्यांची डोली जालना रोडवरील गणेश हाउसिंग सोसायटी मधील अशोक लोढा यांच्या निवासस्थानापासून निघाली. यावेळी सर्व क्षेत्रातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिवंगत मदनबाई लोढा यांच्या पश्चात तीन मुले एक मुलगी (पुष्पा संदीप भंडारी, पुणे), सुना, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते प्रेमचंद (बाबुशेठ) लोढा, स्व. सतीश लोढा, दिलीपचंद लोढा, भाजपचे शहराध्यक्ष अशोक लोढा यांच्या त्या मातोश्री होत.लोढा कुटुंबीयांवर कोसळलेल्या दुःखात दैनिक समर्थ राजयोग परिवार सहभागी आहे.

# सात वर्षीय उमरान जाफरीने केला पहिला रोजाचा उपवास

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई शहरातील सामाजिक कार्यकर्ते खलीलुद्दीन जाफरी यांचा मुलगा चि उमरान जाफरी याने केवळ सात वर्षांच्या वयात त्याचा पहिला रोजा (उपवास) ठेवला आहे. दिवसभर उपवास करून उमरान संध्याकाळी रोजा सोडतानाचा जाफरी कुटुंबासाठी तो एक अत्यंत कौतुकास्पद क्षण होता. कारण त्याच्या वयात असा उपवास ठेवणे हे साधारणतः अपवादात्मक असे मानले जाते. उमरानने केलेला हा उपवास त्याच्या संपूर्ण धार्मिक परंपरेनुसार केला. कुटुंबातील सर्व जेष्ठ सदस्यांनी उमरानला धार्मिक श्रद्धा आणि संस्कृतीतून त्याला रोजा ठेवण्यासाठी प्रेरित केले. त्याला एक उत्तम नागरिक आणि धार्मिक विचारांमध्ये प्रगल्भ होण्यासाठी प्रोत्साहित करत आहोत. त्याने आपल्या वयाप्रमाणे उपवास ठेवला त्यामुळे त्याच्यातील आत्मविश्वास वाढला असल्याचे त्याचे वडिल खलीलुद्दीन जाफरी यांनी सांगितले.



उम्राने या वयात केलेल्या उपवासाबद्दल त्याचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी , उपाध्यक्ष दिनेश भराडीया, गटनेते सय्येद ताहेर, नगरसेवक मुन्ना पठाण, यांच्यासह चि उमरान याच्या मित्रांनीही त्याचे अभिनंदन केले आहे आणि त्याच्या धार्मिक शिस्त आणि कष्टांची प्रशंसा केली आहे. लहान वयात केलेल्या सहसामुळे उमरानची शारीरिक आणि मानसिक शिस्त अधिक चांगली होईल. त्याच्या या प्रगल्भतेमुळे त्याला भविष्यात अनेक मोठ्या आव्हानांचा सामना करण्याची ताकद मिळेल. त्याच्या या कठोर परिश्रमामुळे त्याच्यावर सर्वांनाच अभिमान आहे आणि तो आणखी मोठा करियर गाठण्याच्या दिशेने पुढे जाईल अशी भावना उमरांनच्या कुटुंबीयांनी व्यक्त केली आहे.

# वडवणी तालुक्यातील महाराजस्व अभियानाचा जनतेने लाभ घ्यावा - तहसीलदार वैभव महिंद्रकर

## चिंचवण व वडवणी येथे विशेष महसूल शिबीराचे आयोजन शिबीरातून सर्व महसूली सेवा एकाच दिवशी उपलब्ध होणार

**वडवणी ।प्रतिनिधी**

**महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून व वडवणी तालुका महसूल प्रशासनाच्या वतीने तालुक्यातील सर्व नागरिकांना सर्व महसूली सेवा एकाच दिवशी उपलब्ध करुन देण्यासाठी वडवणी तालुक्यात दि.७ रोजी चिंचवण येथे व दि.१४ रोजी वडवणी येथे शासन सेवा आता आपल्या दारी या अनुषंगाने विशेष महसूल शिबीरांचे आयोजन छत्रपती शिवाजी महाराज महसूल महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा क्र.१ यांच्या माध्यमातून करण्यात आले असून तरी वडवणी तालुक्यातील या महाराजस्व शिबीर अभियानाचा जनतेने लाभ घ्यावा असे आवाहन तहसीलदार वैभव महिंद्रकर यांनी केले आहे.**

याबाबत अधिक माहिती अशी की, महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून व वडवणी तालुका महसूल प्रशासनाच्या वतीने तालुक्यातील सर्व नागरिकांना सर्व महसूली सेवा एकाच दिवशी एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देण्यासाठी शासन सेवा आता आपल्या दारी या अनुषंगाने वडवणी तालुक्यात विशेष महसूल शिबीरांचे आयोजन छत्रपती शिवाजी महाराज महसूल महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा क्र.१ यांच्या माध्यमातून करण्यात आले असून या अंतर्गत येत्या दि.७ मार्च २०२६ शनिवार रोजी सकाळी ठीक ११ वाजता चिंचवण या गावात तसेच त्यापुढील आठवड्यात म्हणजेच दि.१४ मार्च २०२६ शनिवार रोजी वडवणी शहरात या विशेष महसूल शिबीरांचे आयोजन करण्यात आलेले आहे. या शिबीरामध्ये प्रामुख्याने पुढील उपलब्ध सेवांचा समावेश आहे. यात विविध कार्यालयांकडील अडचणी निवारण, जिवंत सातबारा मोहिम, संगायो/श्रावणबाळ सामाजिक अर्थसहाय्य योजनांसाठी अर्ज स्विकारणे तसेच हयात प्रमाणपत्र स्विकारणे, विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक दाखल्यांचे अर्ज स्विकारणे, ऍग्रीस्ट्रेक योजना, मंजूर फेरफार प्रकरणांतील सातबारा, फेरफार उतारा व खाते उतारा यांचे वाटप, सातबारा मधील त्रुटी संदर्भात अर्ज स्विकारणे व दुरुस्ती प्रकरणे, डिजीटल सातबाराच्या कायदेशीर वैधतेबाबत जनजागृती, भोगवटदार वर्ग २ जमिन वर्ग १ मध्ये रुपांतर मार्गदर्शन तसेच आवश्यक अधिकार अभिलेख उपलब्ध करुन देणे, तुकडेबंदी कायद्यानुसार जमिन व्यवहार नियमितीकरण मार्गदर्शन, अकृषक तरतुदी एन.ए. संदर्भातील मार्गदर्शन, पुरवठा विभाग संदर्भातील रेशन कार्ड विषयक अर्ज, जन्म-मृत्यू नोंद प्रमाणपत्र संदर्भात अर्ज, नैसर्गिक आपत्ती नुकसान भरपाई ई-केवायसी पूर्ण करणे, लक्ष्मी मुक्ती योजना, नविन मतदार नोंदणी करणे ई-मोजणी प्रॉपर्टी कार्ड वाटप/वारस नोंदी/नकाशा वाटप, पीएम किसान लँड सिडींग/आधार सिडींग/ई-केवायसी करणे, आरोग्यविषयक आयुष्य भारत/आभा कार्ड, लाडकी बहीण योजना ई-केवायसी कामकाज, इतर सर्व प्रशासकीय अर्ज, कृषी विभाग योजनेंतर्गत अर्ज, पंचायत समितीचे योजनेंतर्गत अर्ज, पशूधन विभागांतर्गत अर्ज, भूमी अभिलेख संबंधित योजनेंतर्गत अर्ज, नोंदणी विभाग अर्ज, महिला व बाल कल्याण विभागांतर्गत अर्ज, महावितरण कंपनीच्या विभागांतर्गत अर्ज यांसह अनेक सुविधांचा यात सामावेश आहे. तरी वडवणी तालुक्यातील सर्व ग्रामस्थ, शेतकरी, विद्यार्थी व नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह संबंधित शिबीर स्थळी उपस्थित राहून शासनाच्या या उपक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन वडवणीचे तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी वैभव महिंद्रकर, सर्व नायब तहसीलदार वडवणी, सर्व मंडळ अधिकारी, सर्व ग्राम महसूल अधिकारी, सर्व महसूल सेवक, कार्यालयीन कर्मचारी तसेच सर्व तालुकास्तरीय कार्यालय प्रमुख वडवणी यांनी केले आहे.

# ग्रामविकासाचा संकल्प श्रमसंस्काराची शिदोरी

## मत्स्योदरी विधी महाविद्यालय रासेयो शिबिराचा उत्साहात समारोप

जालना ।प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संलग्नित मत्स्योदरी विधी महाविद्यालय जालना व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराचा समारोप तांदुळवाडी बु.येथे ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त उपस्थितीत आणि ग्रामविकासाच्या नव्या संकल्पांसह उत्साहात पार पडला.पाणलोट व्यवस्थापन व पडीत जमीन शाश्वत विकासासाठी युवा या संकल्पनेवर आधारित या शिबिराने विद्यार्थ्यांना केवळ श्रमदानच नव्हे तर सामाजिक बांधिलकीची जाणीवही करून दिली.युवकांची ग्रामविकासात निर्णायक भूमिका

समारोप प्रसंगी मार्गदर्शक म्हणून डॉ.बी.आर.गायकवाड प्रशासकीय अधिकारी मत्स्योदरी शिक्षण संस्था उपस्थित होते.विशेष उपस्थिती म्हणून अंकुशराव टोपे महाविद्यालय चे प्राचार्य प्रो.डॉ. दादासाहेब गजहंस लाभले.

प्रमुख पाहुणे प्रा.डॉ.रमेश वाघमारे जिल्हा समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना, जालना यांनी महाराष्ट्रातील विविध गावांतील यशस्वी उपक्रमांचा उल्लेख करताना युवकांची भूमिका ग्रामविकासात अत्यंत महत्त्वाची असल्याचे ठामपणे सांगितले.विद्यार्थ्यांनी ग्रामविकासाचा संकल्प करून सामाजिक परिवर्तनासाठी पुढाकार घ्यावा असे प्रेरणादायी आवाहन त्यांनी केले.



शिबिरामुळे गावात सकारात्मक परिवर्तन तांदुळवाडी येथील प्रगतशील शेतकरी परमेश्वर भिसे यांनी शिबिरामुळे गावात स्वच्छता पर्यावरण जनजागृती आणि सामाजिक एकात्मता वृद्धिंगत झाल्याचे नमूद केले.जि.प.प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका कुलकर्णी एस. बी.यांनी भविष्यातही असे शिबिर आयोजित व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शेख टी.वाय.होत्या.त्यांनी विद्यार्थ्यांच्या श्रमदान, वृक्षारोपण,स्वच्छता मोहीम व जनजागृती उपक्रमांचे विशेष कौतुक करून सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश दिला.ग्रामस्थांचा सन्मानपूर्वक निरोप समारोपावेळी सरपंच उज्ज्वला आनंद भिसे यांनी ग्रामस्थांच्या वतीने मान्यवर, कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या भोजनाची व्यवस्था करून शाल व पुष्पगुच्छ देत शिबिरार्थींचा सन्मानपूर्वक निरोप दिला.

या कार्यक्रमास ग्रामस्थ, मान्यवर महाविद्यालयाचे रासेयो विभाग प्रमुख प्रा.गोरे एस.जे., प्रा.पवार आर.पी.,डॉ.देशमुख एस.व्ही.,प्रा.शेख एच.एम.,प्रा. हेमंत घायाळ,प्राध्यापकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. जोशी व्ही.एस.यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.हंगरगे एस. डी.कार्यक्रमाधिकारी यांनी मानले.

# ग्राम उन्नती इंग्लिश स्कूल मध्ये होळी व रंगपंचमीची आनंदात उत्साहात साजरी

जाफ्राबाद ।हरी भालके

जाफराबाद शहरासह ठीक ठिकाणी रंगपंचमी उत्साहात व शांततेत साजरी होळी नंतर येणाऱ्या रंगपंचमीच्या सर्व लहान थोरांना उत्सुकता असते सर्व आतुरते वाट बघत असतात यामध्ये कृत्रिम रंगांना फाटा देत आदर्श नगर जाफ्राबाद येथील ग्राम उन्नती इंग्लिश स्कूलच्या विध्यार्थ्यांनी त्वचेवर होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी विविध फुलापासून नैसर्गिक रंग तयार करून पर्यावरण पूरक रंग एक मेकांना लावून शाळेतच रंग पंचमीचा आनंद घेतला. विशेष बाब म्हणजे नैसर्गिक पर्यावरण पूरक रंगाची कल्पना शाळेचे संस्थापक अध्यक्ष मा. प्रभाकर गाडे साहेबांनी दिली असता शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती रत्ना रमेश भिसे (हिवाळे ) उप मुख्याध्यापक दमूता गाडेकर, तसेच सर्व शिक्षक वृंद मिनाक्षी पैठणे, वैशाली राऊत,



मनीषा टोम्पे, श्वेता पारवे, स्वप्नाली पडोळ, वैशाली शेवाळे, तसेच शाळेच्या मदतनीस मिसाळ मावशी रासायनिक रंगामुळे कुठल्याही विध्यार्थ्याला इजा पोहचू नये रंगपंचमीच्या सणाचा बेरंग होऊ नये म्हणून नैसर्गिक रंगात सर्व शिक्षक वृंदानी विध्यार्थ्यांसमवेत रंग पंचमी आनंद घेतला उत्साही संगीतमय प्रसन्न वातावरण नैसर्गिक रंगाच्या माध्यमातून ग्राम उन्नती इंग्लिश स्कूल आदर्श नगर जाफ्राबाद येथे रंग पंचमीचा सण साजरा करण्यात आला.

# कडकडीत उन्हातही ७ वर्षीय तोहुरा चाऊसचा आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण

अंबड ।प्रतिनिधी

वाढते तापमान कडकडीत उन्हाचा तडाखा आणि अंगाची लाही करणारी उष्णता अशा परिस्थितीतही अंबड येथील अवघ्या ७ वर्षीय चिमुकली तोहुरा सरहन चाऊस हिने अपार श्रद्धा आणि जिद्दीच्या बळावर आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.अंबड येथे वास्तव्यास असलेले सरहन चाऊस यांची कन्या तोहुरा हिने पवित्र रमजान महिन्यात अल्लाह तआलावरील अढळ विश्वास आणि उपासनेची भावना जपत सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत संयम शिस्त आणि सबुरीचे उदाहरण घालून दिले.एवढ्या लहान वयात रोजाचा अर्थ समजून घेत भूक-तहान सहन करत तिने पूर्ण दिवसाचा रोजा यशस्वीरीत्या पार पाडला.सध्या तापमानाचा पारा चढलेला असतानाही तोहुराने दाखवलेली



चिकाटी आणि श्रद्धा पाहून परिसरात तिचे कौतुक होत आहे.रमजान महिन्यात रोजा म्हणजे केवळ उपवास नसून आत्मसंयम सहनशीलता आणि मानवतेची जाणीव जागवणारी साधना आहे.या पवित्र साधनेची सुरुवात तोहुराने लहान वयातच केल्याने चाऊस कुटुंबियांचा आनंद गगनात मावेनासा झाला आहे.या प्रसंगी जावेद चाऊस, गालेब चाऊस,जूमन चाऊस, फैसल मामा,ताहिर मामा,नासेर मामा यांसह संपूर्ण चाऊस परिवाराने तोहुराचे मनःपूर्वक अभिनंदन करत तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला.

तोहुराच्या या कृत्यामुळे अंबडमध्ये श्रद्धा संस्कार आणि कुटुंबातील धार्मिक वातावरणाचे सुंदर दर्शन घडले असून या चिमुकलीने आपल्या कृतीतून वय लहान पण श्रद्धा महान हेच सिद्ध करून दाखवले आहे

# बारसवाड्यात होळी-धुलीवंदनाचा पारंपरिक पद्धतीने सण उत्साहात साजरा

अंबड।प्रतिनिधी

मौजे बारसवाडा ता.अंबड जि.जालना येथे सालाबादप्रमाणे यंदाही होळी व धुलीवंदन सण मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. दि.२ मार्च २०२६ रोजी संध्याकाळी गावातील मारुती मंदिर बारसवाडा समोर ग्रामस्थ मोठ्या संख्येने एकत्र जमले.

गावचे पोलीस पाटील जगन्नाथ माळकरी यांच्या हस्ते विधिवत पूजा करण्यात आली.पारंपरिक रितीरिवाजांनुसार पुरणपोळीचा नैवेद्य दाखवून होळीला अग्नि देण्यात आला.यावेळी गावकऱ्यांनी एकमेकांना होळी व धुलीवंदनाच्या शुभेच्छा देत सणाचा आनंद



द्विगुणित केला.

परंपरेची जपणूक एकतेचा संदेश होळी दहनाचा कार्यक्रम अत्यंत पारंपरिक पद्धतीने पार पडला.लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांनी या उत्सवात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. गावातील वातावरण भक्तीमय आणि आनंदमय झाले होते.

धुलीवंदनाच्या दिवशीही रंगोत्सव साजरा करत ग्रामस्थांनी बंधुभाव आणि एकतेचा संदेश दिला.जुन्या मतभेदांना विसरून नव्या उत्साहाने जीवन जगण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

संस्कृतीचा वारसा कायम

बारसवाड्यातील होळी-धुलीवंदन उत्सवाने ग्रामीण संस्कृतीची परंपरा जपत सामाजिक ऐक्याची भावना दृढ केली.परंपरा,श्रद्धा आणि आनंदाचा संगम असलेला हा सण ग्रामस्थांच्या एकोप्याचे प्रतीक ठरला.



# लाईन मेन दिवस उत्साहान साजरा

## स्मार्ट काळानुसार कर्मचाऱ्यांना भेटवस्तू देऊन सन्मान

तामसा (प्रतिनिधी ) महावितरण विज कंपनी तामसा कार्यालयात आज दिनांक चार मार्च रोजी लाईन मेन दिवस साजरा करण्यात आला. तामसा येथे महावितरण विज कंपनी कार्यालयात मोठ्या उत्साहाने लाईन मेन दिवस साजरा करण्यात आला यावेळी वीज वितरण कंपनीचे शाखा अभियंता विनोद वाठोरे, तांत्रिक संघटनेचे विभागीय सचिव सचिन सोनसळे यांच्या हस्ते लाईन मेन कर्मचाऱ्यांना फेटे बांधून आधुनिक काळात गरज असलेल्या वीज सामग्री म्हणून पकड आणि विशेषतः आधुनिक मीटरला मार्क करण्यासाठी मार्कर पेन देऊन सन्मानित करण्यात आलं या या कार्यक्रमात वरिष्ठ तार मार्ग कर्मचारी बजरंग हरणे, सचिन कदम, संदीप जाधव, किशोर उन्हाळे, संकेत गिमेकर,अजय जाधव,गजानन स्वर्णकार, बालाजी शिंदे, अमोल कटकुळे, अभिजीत पवार, साईनाथ कायत्मवाड, रामचंद्र जाधव, शेख बाबू, संतोष मदने, सुकापुरे, मारुती जाधव, माधव ठेंगळ, साहेबराव हमंद सह कर्मचारी उपस्थित होते. आधुनिक काळानुसार वैज्ञानिक तकनीकींना बनविलेल्या स्मार्ट मीटरवर मार्किंग करण्याचा अति आवश्यक मार्कर पेन तार मार्ग कर्मचाऱ्यांना भेटवस्तू म्हणून देण्याचा अभिनव उपक्रम राबवून शाखा अभियंता विनोद वाठोरे यांनी चार मार्ग कर्मचाऱ्यांना भेट वस्तू दिल्या..

# गाव पातळीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलीस पाटलाची भूमिका महत्त्वाची उपमहानिरीक्षक शहाजी उमाप

मुदखेड (प्रतिनिधी)- पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये कायदा, सुव्यवस्था व शांतता कायम ठेवण्याकरिता पोलीस पाटलांनी पोलीस ठाण्याशी समन्वय साधून सतर्क असावे, असे आवाहन पोलीस ठाण्याच्या वार्षिक तपासणी दरम्यान नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले. त्यांनी पोलीस ठाण्याच्या वार्षिक तपासणी दरम्यान पोलीस पाटील व तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष यांच्याशी संवाद साधला. याप्रसंगी ते बोलत होते.

यानिमित्ताने वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण यांच्या संकल्पनेतून शहर सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे संगणकप्रणालीद्वारे उद्घाटनही त्यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण यांच्यासह इतर पोलीस अधिकारी, कर्मचारी यांची उपस्थिती होती. या भेटीदरम्यान विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप खत्रझ्झ नांदेड, अविनाश कुमार पोलीस अधीक्षक नांदेड यांचा पत्रकार नामदेव राहेरे यांनी सत्कार केला. वार्षिक तपासणी दरम्यान बरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी पोलीस ठाण्या अंतर्गत विविध गुन्हे, इतर कायदा व मुव्यवस्थेच्या दृष्टीने पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण यांच्यामार्फत माहिती जाणून घेतली आणि त्यावर उपाययोजना करण्याच्या सूचना अधिनस्त पोलीस अधिकारी, कर्मचारी यांना दिल्या. त्याचप्रमाणे पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गावपातळीवरील कायदा सुव्यवस्थेच्या दृष्टीने इतर माहिती देखील पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पोलीस पाटील आणि तंटामुक्त गाव समितीचे यावेळी प्रत्येक गावचे पोलीस पाटील बैठकीस हजर होते गाव वाईज पोलीस पाटील राजेंद्र पाटील डोणगाव ,सारिका खानसोळे शिखाचीवाडी , सिताराम मात्रे हजापूर, गंगासागर गाडे पांगरगाव , सुनील गायकवाड पिंपळकोठा, आदिनाथ ढगे महाटी , अशोक चव्हाण चिकाळातांडा, गंगाधर कोलते चिलपिपेरी ,गणेश हिंगोले चिकाळा, शुभांगी येडे वासरी , मीना शिंदे टाकळी, प्रियंका शिंदे माळकोटा, मंजिशा माचरडे , कीर्ती यादव कोल्हा , प्रताप पवार आमदार,आदी गावचे पोलीस पाटील , शहाजी उमाप खत्रझ्झ नांदेड, पोलीस अधीक्षक अविनाश कुमार नांदेड अर्चना पाटील अपर पोलीस अधीक्षक नांदेड यांचा पोलीस पाटलाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

आदि गावचे पोलीस पाटील तंटामुक्ती अध्यक्ष पोलीस कर्मचारी गृहरक्षक दल उपस्थित होते.

# पत्रकार संघाच्या राज्यस्तरीय नवचेतना पुरस्काराने राजु पाटील सन्मानीत

बिलोली /प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने सन २०२५-२६ या वर्षाचा जाहीर राज्यस्तरीय नवचेतना पुरस्कार २८ फेब्रुवारी रोजी वाशीम येथे आयोजित पत्रकार संघाच्या २७ व्या राज्यस्तरीय अधिवेशनात केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव व अनेक प्रमुख मान्यवरांच्या हस्ते सदर पुरस्काराचे मानकरी बिलोली चे ज्येष्ठ पत्रकार राजू पाटील शिंपाळकर यांना प्रदान करण्यात आला.




बिलोलीचे ज्येष्ठ पत्रकार राजु पाटील शिंपाळकर यांनी सदरील पत्रकार संघाच्या माध्यमातून गेल्या आनेक वर्षा पासुन विविध पदावर काम करीत आसताना सामाजिक उपक्रमा बरोबर विविध कार्यक्रमातुन पत्रकारांसाठी आनेक प्रेरणादायी उपक्रम हाती घेऊन संघटनात्मक कार्य पुढे ते नेटाने नेत असून या विविध कार्याची दखल महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाने घेऊन त्यांच्या या संयुक्त विद्यमाने दिनांक २८ फेब्रुवारी रोजी जिल्हा वासिम येथे आयोजीत २७ व्या राज्यस्तरीय पत्रकार संघाच्या अधिवेशनात राज्यस्तरीय नवचेतना उत्कृष्ट संघटक पुरस्कार केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, भागवताचार्य प. पु. रमाकांतजी व्यास प. पु गजानंद माऊली पत्रकार संघाचे प्रदेश कार्याध्यक्ष निलेश सोमानी प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी जेष्ठ संपादक डॉ.राजेश राजोरे यांच्यासह अनेक प्रमुख मान्यवरांच्या हस्ते बिलोलीचे जेष्ठ पत्रकार महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे मराठवाडा विभागीय उपाध्यक्ष राजु पाटील शिंपाळकर याना सन्मानचिन्ह व मानपत्र प्रदान करण्यात आले . यावेळी राज्यातील पत्रकार संघांचे पदाधिकारी,पत्रकार बांधव व विविध राजकिय सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मंडळी मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

# महसूल व पोलीस प्रशासनाच्या छुप्या मदतीने तामसा भागात वाळूचा गोरखधंदा तेजीत

**तामसा - (प्रतिनिधी )महसूल प्रशासनाचा ग्रीन सिग्नल आणि पोलीस प्रशासनाच्या छुप्या मदतीनेच तामसा भागात राजरोसपणे २० - २५ हायवा, १० - १५ टिपर, ट्रॅक्टर असा अवैध वाळू वाहतुकीचा गोरखधंदा तेजीत आला आहे. मात्र किमान अर्ध्या दशकात स्थानिक पोलीस आणि महसूल खात्याच्या मंडळ अधिकारी, तलाठी किंवा विशेष पथकाने एकही कारवाई केली नसल्याने मोठे आश्चर्य व्यक्त होत आहे.**

शासनाचा लाखोंचा महसूल बुडवत तामसा भागात राजरोसपणे वाळूची बेसुमार वाहतूक, मुरुम, दगडांचे अवैध उत्खनन व वाहतुकीने चांगलाच उच्छाद घातला आहे. मात्र महसूलचे मंडळ अधिकारी, तलाठी, विशेष पथक किंवा स्थानिक पोलीस प्रशासन त्या गोरखधंद्यावर कडक कारवाई करण्याऐवजी धंदेचालकांशी सलगी करीत कुंपणच शेत खात असल्याचा प्रकार करतात. त्यावरून वाळू, मुरुमाच्या धंद्यात जवळजवळ सगळ्यांचीच मिलीभगत असल्याचे स्पष्ट होते. शासनाचे उत्पन्न वाढवणाऱ्या गौण खनिज संपत्तीपोटी शासनाच्या तिजोरीत रॉयल्टीतून मोठा महसूल जमा होऊ शकतो. परंतु तो महसूल तिजोरीत जाण्याऐवजी पोलीस आणि महसूलचे लोकसेवक त्यावर परस्पर डल्ला मारण्याचा सोयीस्कर उद्योग करतात, हे वास्तव आहे. उल्लेखनीय म्हणजे २३ मार्च रोजी सोमवारी पहाटे अवैध वाळू वाहतूक करणारे दोन हायवा महसूल विभागाच्या तलाठी, मंडळ अधिकाऱ्यांच्या एका पथकाने तामस्याजवळ पकडले आणि कारवाई न करता तडजोडीअंती सोडून दिल्याची शहरात जोरदार चर्चा रंगली आहे.

हदगाव तालुक्यातील वानवाडी, वारकवाडी शिवारात कैक वर्षांपासून निसर्ग सौंदर्याने नटलेल्या, परिसराचे सौंदर्य वाढवणाऱ्या डोंगरटेकड्या भुईसपाट केल्या. तालुका आणि जिल्हा प्रशासनाच्या निष्क्रियतेवर ठपका ठेवत आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी हिवाळी अधिवेशनात तालुक्यातील अवैध मुरुम उत्खननाचा लक्षवेधी प्रश्न उपस्थित करुन दोषीवर कारवाईची मागणी केली होती. तरीही प्रशासनाकडून निर्णायक कारवाई होत नाही. त्यामुळे महसूल प्रशासनाच्या लेकी विद्यमान आमदाराच्या तक्रारीला काहीच महत्त्व नाही का? अशी नागरिकांतून कुजबुज सुरू आहे.

महसूल प्रशासनाचा ग्रीन सिग्नल आणि पोलीस प्रशासनाच्या छुप्या मदतीनेच तामसा भागात राजरोसपणे २० - २५ हायवा, १० - १५ टिपर, ट्रॅक्टर असा अवैध वाळू वाहतुकीचा गोरखधंदा तेजीत आला आहे.